cmyk

संपादकीय

किमान जिवासाठी सद्सद् विवेक वापरा!

श्रद्धास्थानी भाविकांच्या वाट्याला दु:ख का यावे? सत्संग जर पवित्र असेल तर तेथे असंगाचा शिरकाव कसा काय होऊ शकतो? श्रद्धा कोणावर असावी, कुठे, का असावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. उत्तर प्रदेशच्या हाथरसमध्ये सत्संगात मंगळवारी जी दुर्घटना घडली त्यामुळे कुणाही सुहृदाचा थरकाप उडेल.

दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८५ | शुक्रवार दि.५ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

मनोज जरांगे पाटील यांच्या वाहन ताफ्याच्या सुरक्षेसाठी सशस्त्र पोलीस नियुक्त

मुंबई: मनोज जरांगे पाटील यांच्या सुरक्षेसाठी एक अधिक सशस्त्र पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या वाहन ताफा सुरक्षेसाठी एक अधिक तीन सशस्त्र पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात ड्रोनद्वारे सर्वेक्षण होत असल्याचे समजताच स्थानिक पोलीस पथक आंतरवाली येथे गेले. तेथील शिवारात पाहणी केली असता पोलीस पथकास ड्रोन आढळून आले नाहीत. तथापि, याबाबत संशयास्पद वाटणाऱ्या बाबींची चौकशी करण्यासाठी तीन स्वतंत्र पथके पोलीस अधीक्षकांनी तयार केली असून चौकशी सुरू आहे, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

पिकविम्याचे ३ हजार कोटी रुपये १५ जुलैपर्यंत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार

कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची विधानसभेत माहिती; खरीपात मिळणार दिलासा

पिकविम्याला पर्याय शोधण्यासाठी समिती गठीत

पिकविम्याच्या अनेक ठिकाणी समस्या येत आहेत. शेतकऱ्यांना त्याचा फटका बसत असल्याच्या तक्रारी असल्याने पिकविम्याला दुसरा काही पर्याय शोधला जावा यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असल्याची माहिती यावेळी धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

२०२० सालचा पिकविमा मिळवण्यासाठी प्रयत्नशिल

२०२० साली कोरोना काळ होता, त्यामुळे अतिवृष्टी व इतर कारणामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीचे शेतकऱ्यांना तक्रारी करता आल्या नव्हत्या. त्यामुळे अनेक शेतकरी विम्यापासून वंचित आहेत. सरकारने विमा कंपनीला नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिल्यावर कंपन्या न्यायालयात गेल्या. तो विमा शेतकऱ्यांना मिळावा यासाठी आम्ही प्रयत्नशिल असल्याचे सांगून बीड जिल्ह्यातही ३ लाख शेतकरी विम्यापासून वंचित असल्याचे ते म्हणाले.

मुंबई । प्रतिनिधी

एक रुपयात पिक विमा योजना राबवणारा देशात महाराष्ट्र हा पहिला असून पिक विम्यापोटी शेतकऱ्यांना ७ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. आतापर्यंत ४ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळाले असून १५ जुलैपर्यंत राहीलेले ३ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत दिली. राज्यातील १ कोटी १० लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार असून त्यामुळे ऐन खरीपाच्या तोंडावर शेतकऱ्यांना हा मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, गेल्या वर्षी राज्यात दुष्काळ पडला असल्याने कापूस आणि सोयाबीनचे उत्पादन घटले. शेतकरी अडचणीत आल्याने राज्य सरकारने कापूस आणि ◀◀ पान २ वर

पीकविमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची लूट

नाना पटोले यांचा आरोप, पीकविम्यासाठी नोंद करावयाची वेबसाईटच बंद

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात मराठवाड्यासह विविध भागात दुष्काळ आहे, शेतकरी संकटात आहे असे असताना शेतकऱ्याला मदत मिळत नाही तर दुसरीकडे पिकविमा कंपन्या शेतकऱ्यांच्या जीवावर खिसे भरत आहेत. राज्यातील सरकार पीक विमा कंपन्यांबरोबर आहे. महसूल विभागाची वेबसाईट आजही बंद आहे, या बेवसाईटवर नोंद झाली नाही तर पीक विमा मिळत नाही. शेतकऱ्यांची लूट करणारे हे पीकविमा धोरण बदलून शेतकरी हिताचे धोरण बनवा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपाप्रणित शिंदे सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, शेतकरी दुष्काळाचा सामना करत असतानाही शेतकऱ्यांना पिक विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळत नाही. सरकार ऐकायला तयार नाही. महाराष्ट्रात रोज ४ शेतकरी आत्महत्या होत आहेत, अधिवेशन काळातही या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. शेतकरी जगला तर देश जगेल म्हणूनच संकटातील शेतकऱ्याला आधार देण्यासाठी सरसकट कर्ज माफी जाहीर करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. पण या सरकारला शेतकऱ्यांचे हित साधायचे नाही, भाजपाप्रणित शिंदे सरकार हे शेतकरी विरोधी असल्याचा आरोपही यावेळी केला. ◀◀ पान २ वर

सरकारचा डाव आहे की, यावर्षी...

» मनोज जरांगे पाटील यांचे मोठे विधान

जालना । प्रतिनिधी

सरकारकडे यंत्रणा आहे. आम्ही आंदोलक आहोत. आम्हाला विश्वास ठेवावा लागेल. धोका होईल, नाही होईल हा भाग वेगळा आहे. आपल्याला दिलेला शब्द पाळतील न पाळतील हा विषय वेगळा आहे. एक आंदोलक म्हणून समाजाची जवाबदारी आपण पेलतो. तर सरकारवर विश्वास ठेवावा लागतो. आडमुठी भूमिका घेतल्याने समाजाचे कल्याण होणार नाही. शंभूराजे देसाई ज्यावेळी आले होते त्यावेळी समाजाला विचारून एक महिना वेळ दिला. सग्या सोयऱ्याची व्याख्या, हैदराबाद, बॉम्बे आणि सातारा गॅझेट बाबत १३ तारखेपर्यंत निर्णय सरकार घेईल, असं मनोज जरांगे म्हणाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांच्यावर समाजाने पुन्हा एकदा विश्वास ठेवला आहे आणि आणि १३ तारखेपर्यंत सग्या सोयऱ्याची अंमलबजावणी आमच्या व्याख्ये प्रमाणे करतील आणि हैदराबाद गॅझेट साठीही तीन पत्र दिल्याचे विधानसभेत शंभूराज देसाई यांनी सांगितले आहे. १३ तारखेपर्यंत आम्हाला न्याय भेटेल आम्हाला विश्वास आहे, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

सरकारने मुलींना मोफत शिक्षणाचा जो अध्यादेश काढला आहे. त्याची अंमलबजावणी होत नाही. मग आदेश काढलाच कशाला? सरकार निर्णय घेते. पण त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे मराठा समाज नाराज होत आहे. मुलींच्या बाबतीत मोफत शिक्षणाचा ◀◀ पान २ वर

मनोज जरांगे काय म्हणाले?

» सरकारने जे दहा टक्के आरक्षण दिले होते आणि मुलांनी जे प्रमाणपत्र काढले होते. ते प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास अडचण येत आहे. मराठा समाज पुरता अडचणी सापडला आहे. सरकारचा डाव आहे का की यावर्षी मराठा समाजाची पोरांची नुकसान करायची आणि याबाबत मी मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की अशी विद्यार्थ्यांना अडकाठी आणू नका, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले आहे.

हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्रीपदी, तिसऱ्यांदा शपथबद्ध

रांची। वृतसंस्था

झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम) प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी तिसऱ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून गुरूवारी (दि.४ जुलै) शपथ घेतली. झारखंडचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी हेमंत सोरेन यांना पदाची व गोपनियतेची शपथ दिली. रांची येथील राजभवनात हा शपथविधी पार पडला. हेमंत सोरेन हे झारखंडच्या स्थापनेपासून २३ वर्षातले १३ वे मुख्यमंत्री ठरले आहेत.

२०१९ विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव झाला. यानंतर भाजपचे नेते अर्जुन मुंडा केंद्रात मंत्री झाले. २०१९ ला झालेल्या निवडणुकीत हेमंत सोरेन यांच्या झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस आघाडी सरकारचा विजय झाला. मात्र जमीन घोटाळा प्रकरणी अटक झाल्याने हेमंत सोरेन यांच्यावर पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपद सोडण्याची नामुष्की ओढवली. ३१ जानेवारी रोजी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सक्तवसुली संचालनालयाने जमीन घोटाळा प्रकरणी अटक केली होती. ◀◀ पान २ वर

पीएम किसानचा हप्ता २ हजाराने वाढणार?

अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना खुशखबर मिळण्याची शक्यता

नवी दिल्ली । वृतसंस्था

पीएम किसानपंतप्रधान किसान सन्मान निधी योजना सुरु होऊन आता ५ वर्षे झाली. योजना सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये मिळतात. पण मागच्या ५ वर्षात महागाई वाढली, उत्पादन खर्च वाढला त्यामुळे पीएम किसानमधून मिळणारी मदत वाढवावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. सरकारने वर्षाला किमान १२ ते १५ हजार रुपये द्यावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत. सरकार याच महिन्यात सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात पीएम किसानचा निधी वाढविण्याची दाट शक्यता आहे.

शेतकऱ्यांसोबत काही कृषी तज्ज्ञांच्या मते पीएम किसानमधून मिळणारी मदत ही एकरी असावी. अर्थमंत्र्यांकडेही शेतकरी, शेतकरी नेते आणि कृषी उद्योगांच्या प्रतिनिधींनी पीएम किसानच्या निधीत वाढ करण्याची मागणी केली. सरकार शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्याची शक्यता आहे. कारण सरकार पीएम किसानच्या निधीत २ हजारांची वाढ करू शकते, असे सांगितले जात आहे. सरकारने पीएम किसान योजना सुरु केली तेव्हापासून शेतकऱ्यांना ६ हजार रुपये मिळतात. सरकारने या योनजेच्या निधित वाढता उत्पादन खर्च, महागाई आणि शेतकऱ्यांना होणारे नुकसान लक्षात घेऊन वाढ करणे अपेक्षित आहे. ही सगळी परिस्थिती लक्षात घेतली तर शेतकऱ्यांना किमान ९ हजार रुपये द्यावेत, अशी शिफारस सरकारमधील काही अधिकाऱ्यांनीही केल्याचे समजते. तेव्हापासून सरकार पीएम किसानचा निधी वाढवेल, अशी चर्चा आहे. खरे तर सरकार पीएम किसानचा निधी लोकसभा निवडणुकीच्या आधी वाढवेल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. पण आता सरकार हा निर्णय घेऊ शकते. पण पीएम किसानचा निधी किती वाढू शकतो याविषयी वेगगेवळी ◀◀ पान २ वर

मेंदू खाणाऱ्या अमीबाने घेतला मुलाचा बळी



केरळ मधील घटनेने खळबळ, दोन महिन्यातील तिसरी घटना

तिरूअनंतपूरम । वृतसंस्था

केरळमध्ये दुर्मिळ अमीबा (अमीबिक मेनिंगोएन्सेफलाइटिस) संसर्गामुळे १४ वर्षाच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. केरळमधील कोझिकोड येथील खासगी रुग्णालयात ही धक्कादायक घटना घडल्याचे वृत्त समोर आले आहे.

केरळच्या आरोग्य विभागाने गुरूवारी दिलेल्या माहितीत सांगितले आहे की, दूषित पाण्यात आढळलेल्या मुक्त-जिवंत अमीबामुळे १४ वर्षीच्या मृदुलचा मृत्यू झाला. बुधवारी (दि.३ जुलै) रात्री ११ वाजून २० मिनिटांनी खासगी रुग्णालयात या मुलावर मृत्यू ओढावला. संबंधित मृत्यू झालेला मुलगा एका छोट्या तलावात आंघोळीसाठी गेला असता, त्याला हा संसर्ग झाल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले की, मुक्त जिवंत नॉन-परजीवी अमिबा बॅक्टेरिया दूषित पाण्यातून शरीरात प्रवेश करतात तेव्हा हा संसर्ग होतो. त्यामुळे आरोग्य विभागाच्या ◀◀ पान २ वर

मे, २०२४ पासून अमीबा संसर्गाने मृत्यू झाल्याची तिसरी घटना

मे, २०२४ पासून दक्षिणेकडील राज्यातील ही अशाप्रकारे प्राणघातक संसर्गाची तिसरी घटना आहे. पहिली घटना २१ मे रोजी मलप्पुरममध्ये पाच वर्षांच्या मुलीचा मृत्यू आणि दुसरी घटना म्हणजे २५ जून रोजी कन्नूरमध्ये १३ वर्षीय मुलीचा अशाचप्रकारे दुर्मिळ अमीबा संसर्गामुळे मृत्यू झाला होता.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : २२.५० क्विंटल			
	२,३०१	३,१००	२,६९३
ज्वारी/हायब्रिड : ३०.०० क्विंटल			
	२,२४१	२,७७१	२,५४०
मूग : १.०० क्विंटल			
	७,२७६	७,५०१	७,३८८
तूर : २.०० क्विंटल			
	१०,७००	१०,९००	१०,७८७
उडीद :०.५० क्विंटल			
	६,०००	६,०००	६,०००
बाजरी: १६.०० क्विंटल			
	२,५४२	२,५९९	२,५७०
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल			
	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीन: ४३.५० क्विंटल			
	४,५१५	४,५२५	४,५२०
हरभरा: १.०० क्विंटल			
	६,३००	६,३००	६,३००

रामकृष्ण हरी शेतकरी फिरतोय दारोदारी

विधीमंडळाच्या दारात महाविकास आघाडीची निदर्शने

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य भाव द्या या प्रमुख मागणीसाठी पावसाळी अधिवेशनाच्या सातव्या दिवशी विधिमंडळ परिसरात महाविकास आघाडी आक्रमक झाली. विरोधी पक्षाच्या आमदारांनी हातात दुधाची बाटली आणि टाळ घेऊन रामकृष्ण हरी शेतकरी फिरतोय दारोदारी अशा घोषणा देत सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

तर विधानसभेलाही फटका – राजू शेट्टी

» शेतकऱ्यांची मागणी दुधाला प्रतिलिटर ४० रुपये बाजारभाव मिळाला पाहिजे अशी आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुती सरकारला फटका बसला आहे. दुधाच्या बाजारभावाचा प्रश्न मार्गी लावा अन्यथा विधानसभा निवडणुकीत तुमचे काही खरे नाही,'' असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिला. ते पुढे म्हणाले, दुधाला अनुदान देताना जाचक अटी लावू नका. विधानसभेला फटका बसायची वाट पाहू नका. दुधाच्या भावाकडे दुर्लक्ष करणाऱ्या पुढाऱ्यांना यापुढे दुधाने आंघोळ घालण्याचे आंदोलन करावे लागेल. शेतीमालाला योग्य दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे असेही शेट्टी म्हणाले.

दूध भुकटी धोरण, शेतकऱ्यांचे होते मरण, अनुदानाची भीक नको, शेतकऱ्यांना द्या हक्काचे दर, अनुदानाची कशाला दाखवताय आस, भुकटी आयात करून पाडताय भाव, दुधाला नाही दर, सरकार वसूल करते शेतकऱ्यांकडून कर अशा विविध घोषणा लिहिलेले फलक हाती घेत शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर मिळावा यासाठी महायुती सरकारला घेरले. देशभरात मोठ्या प्रमाणात दुधाची पावडर शिल्लक असताना केंद्र सरकारकडून दूध पावडरच्या आयातीला परवानगी दिली आहे. अपेक्षित दर नसल्याने पावडर विक्री तोट्यात करावी लागत आहे. त्यातच केंद्राने घेतलेल्या या निर्णयाने देशातील दूध दरावर थेट परिणाम तर होण्याची शक्यता आहे. तसेच देशात सुमारे दोन लाख टन आणि महाराष्ट्रात सुमारे २० हजार टन दूध पावडर शिल्लक आहे. कोरोना दरम्यान दूध पावडरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. त्यानंतर, पुन्हा ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

किमान जिवासाठी सद्सद् विवेक वापरा!

श्रद्धास्थानी भाविकांच्या वाट्याला दु:ख का यावे? सत्संग जर पवित्र असेल तर तेथे असंगाचा शिरकाव कसा काय होऊ शकतो? श्रद्धा कोणावर असावी, कुठे, का असावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. उत्तर प्रदेशच्या हाथरसमध्ये सत्संगात मंगळवारी जी दुर्घटना घडली त्यामुळे कुणाही सुहृदाचा थरकाप उडेल. उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्याच्या फुलराई गावात एका सत्संग कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरी होऊन किमान १३० भाविकांचे मृत्यू झाले असून दोनशेहून अधिक भाविक जखमी झाले असावेत अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

सत्संग कार्यक्रमासाठी हजारो भाविक जमले होते. दुर्घटना घडण्यापूर्वी परमेश्वर चरणी लीन झालेल्या भाविकांचा जल्लोष सुरू होता, मंगलमय वातावरणात क्षणार्धात अमंगल घडले आणि केवळ आक्रोश अन् किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या. कार्यक्रम संपल्यानंतर बाहेर पडताना चेंगराचेंगरी झाली असे सांगण्यात येते. ज्या हॉलमध्ये सत्संग आयोजित करण्यात आला होता तेथे मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली. सत्संग संपल्यानंतर बाहेर पडताना गर्दीमुळे धक्काबुक्की झाली, लोक एकमेकांच्या अंगावर कोसळले. चेंगराचेंगरीत पायदळी तुडवले गेल्याने अनेकांचा मृत्यू झाला. दुर्घटनेबाबत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दु:ख व्यक्त केले असून मृतांच्या वारसांना प्रत्येकी २ लाख तर जखमींना प्रत्येकी ५० हजारांची मदत जाहीर केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबाबत दु:ख व्यक्त केले, हेही नेहमीचेच. हाथरस जिल्ह्यात प्रवचन देणाऱ्या बाबाचे नाव नारायण साकार विश्व हरी ऊर्फ भोलेबाबा असे आहे. तो पूर्वी पोलिस दलात होता म्हणे. स्वेच्छानिवृत्ती घेऊन त्याने २० वर्षांपूर्वी सत्संग सुरू केला. कोरोना काळातही त्याचा सत्संग वादात सापडला होता. कधी पांढऱ्या कपड्यात तर कधी टाय लावून सत्संग करणारा हा बाबा उत्तर प्रदेश व राजस्थानात प्रसिद्ध असून त्याचे समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांबरोबर संबंध आहेत म्हणे. सध्या हे बाबा आणि सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करणारे फरार असून पोलिसांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. बम बम भोलेबाबाचे स्तोम सध्या अनेक राज्यांत माजले असून त्यांच्यापुढे राजकीय नेते नतमस्तक होतात. त्यामुळे या बाबा मंडळींना प्रतिष्ठा मिळते. महाराष्ट्रही याला अपवाद नाही.

भोलेबाबाच्या सत्संगाला २० हजारहून अधिक अनुयायी उपस्थित होते असे सांगितले जाते. हॉल गर्दीच्या तुलनेत छोटा होता, त्यामुळे हॉलबाहेरही अनुयायी उभे होते. सत्संगानंतर भोलेबाबाचा ताफा हॉलबाहेर पडला. तोपर्यंत सुरक्षा रक्षकांनी गर्दी रोखून धरली होती. ताफा बाहेर पडताच सुरक्षा रक्षकांनी गर्दीला मोकाट सोडले. भोलेबाबांची पायधूळ (चरणरज) कपाळी लावण्यासाठी, गोळा करण्यासाठी अनुयायांमध्ये चढाओढ सुरू झाली. त्याचे रुपांतर चेंगराचेंगरीत झाले असे सांगण्यात येत आहे. हे सारे खरे असेल तर हा शुद्ध वेडेपणा नव्हे काय? पण हे सांगणार कोण? कारण कोणाच्या भावना, श्रद्धा कशा असतील, कोठे असतील ते सांगता येत नाही. कळतही नाही अन् वळतही नाही अशी स्थिती. काही सांगायला जावे तर भावना दुखावल्या जाण्याच्याच शक्यता अधिक. धार्मिक कार्यक्रमात मोठ्या दुर्घटना घडण्याचे प्रकार देशात अनेकवेळा घडले आहेत परंतु त्यापासून आपण काहीच बोध घेतलेला नाही. देवळात, मंदिरात, सत्संग कार्यक्रमात, उत्सवात चेंगराचेंगरीच्या घटना घडणार हे जणू काही आपण गृहितच धरले आहे. पण यात निष्पापांचे बळी जातात त्याचे काय?

सौर कृषी पंपांकरिता लाभार्थी शेतकऱ्यांवरील भार वाढवलेला नाही-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई। प्रतिनिधी

प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवम्? उत्थान महाअभियान (पीएम कुसुम) ची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सर्वसाधारण शेतकरी लाभार्थी हिस्सा १० टक्के, तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी लाभार्थी हिस्सा ५ टक्के असून यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत याबाबच्या प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले.

सदस्य राम शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. तर, याअनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सतेज पाटील यांनी सहभाग घेतला. याबाबत अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, या योजनेअंतर्गत केंद्र शासन त्यांच्याकडील निर्धारित केलेली सौर कृषी पंपाची आधारभूत किंमत किंवा ई-निविदा प्रक्रियाद्वारे क्षमतानिहाय दर व पुरवठादारांची नावे नोंदणीकृत करून राज्यांना कळविते. या दरांमध्ये २०१९-२० आणि २०२०-२१ च्या तुलनेत २०२३-२५ साठी निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेले सौर कृषी पंपांचे क्षमतानिहाय दरात वाढ झाल्याचे दिसून येते. यामुळे त्याप्रमाणात शेतकऱ्यांच्या हिश्श्यात वाढ झालेली दिसून येते. या योजनेअंतर्गत सौर कृषी पंपांच्या किंमतीच्या ३० टक्के रक्कम केंद्र शासन, ३० टक्के रक्कम राज्य शासन व ४० टक्के रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांनी द्यावयाची होती. तथापि, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून सर्वसाधारण शेतकरी लाभार्थी हिस्सा १० टक्के, तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी लाभार्थी हिस्सा पाच टक्के आणि ६० टक्के व ६५ टक्के रक्कम राज्य शासन व अतिरिक्त वीज कराद्वारे भरावी, असा निर्णय घेऊन राज्यातील कृषी पंप वीज जोडणीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियान सुरू करण्यात आले आहे. पूर्वी पॉली क्रिस्टलाईन पॅनलचा वापर होत होता. आता मोनो क्रिस्टलाईन पॅनलचे पंप येत आहेत. या पंपांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे. त्या अनुषंगाने किंमतीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या हिश्श्यात वाढ झालेली दिसून येत असल्याचे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

आषाढस्य असे प्रथम दिवसे!

» ६ जुलै आषाढ महिना सुरु होत आहे या निमित्ताने आषाढचिंतन करणारा हा विशेष लेख

साऱ्यांनाच उत्सवाची चाहुल देणा-या आपल्या उत्सव आणि परंपरा जपणाऱ्या देशामध्ये सर्व रिती आणि परंपरा या पावसाशी निगडित आहेत आणि त्यावर आधारित जीवनपद्धती आपण आजवर जगत आलेलो आहोत.

मौसमी हवामानाच्या प्रदेशात असणाऱ्या भारत देशात आजही मातीशी नातं सांगणारी जीवनशैली आहे. गेल्या ५० वर्षात मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालं याचा परिणाम म्हणून नव्या पिढीची ग्रामीण भागाशी असलेली नाळ तुटली आहे हे देखील नाकारता येणार नाही मात्र जुनी पिढी आजही ग्रामीण जीवन आणि त्यातील गोडवा जपताना आपणास दिसेल.

ग्रामीण जग हे शेती आधारित वेगळं असं विश्व आहे. जून महिन्यात मृग लागल्यानंतर होणारी ती पेरण्यांची लगबग स्थिरावण्याचा आणि एकूणच आलेला पाऊस देखील स्थिर होण्याचा काळ म्हणजे आषाढाचा महिना याला ग्रामीण भागात आघाडाचा महिना असंही म्हणतात.

संस्कृत महाकवी कालिदास यांनी लिहिलेलं 'आषाढस्य प्रथम दिवसे.,. ' हे विरह काव्य सर्वांना माहीत आहे. या काव्याच्या भाषिक आणि साहित्यिक मूल्याची वेगळी मांडणी होऊ शकेल आणि ती होते देखील मग आपल्या प्रियतमेला मेघांच्या माध्यमातून संदेश देण्याची ती कल्पना आणि त्या मागील वेदना मला अधिक महत्त्वाची वाटते. घरापासून दूर राहताना मनातल्या भावना काय आहेत हे संदेशाद्वारे मेघांनी अर्थात दाट गर्दी करून वाहणाऱ्या ढगांनी तिच्यापर्यंत न्याव्यात ही मूळ कल्पना.

कवी कालिदास आणि त्यांचं काव्य पुढे विविध प्रकारे सर्वच भाषिक साहित्यांत उतरलं आणि केवळ भाषांतरापुरतं मर्यादित न राहता त्या काव्याच्या प्रेरणेतून अनेक साहित्यिक कलाकृती नंतरच्या काळात निर्माण झाल्या. मूळ भावना आणि अशय समान असला तरी त्याला प्रत्येकाने आपापल्या परीने वेगळं शब्दांचं कोंदण दिलय.

मराठी प्रमाणेच हिंदीत आणि विशेषत: उर्दू भाषेत यावर आधारित रचना व मोठ्या प्रमाणावर आपल्यासमोर आल्या. आपल्याकडे चित्रपट सृष्टीच्या माध्यमातून देखील यात सातत्याने भर पडलेली आहे.

तसं नाही म्हणायला पाऊस आणि कविता हे एक आगळं नात आहे. पावसाच्या सरी कमी पडतील इतका भावनांचा पाऊस कवी आपल्या शब्दांना गुफूंन कवितेच्या माध्यमातून याच काळात पाडत असतात. त्यात पाऊस काव्य, पाऊस गाणी असा विचार करताना वयानुसार पाऊस आणि माणसाचं त्यासोबतचं नातं कसं बदलत जातं याचाही अनुभव आपणास सर्वच भाषिक साहित्यात दिसेल. पावसाच्या पडणाऱ्या प्रत्येक थेंबासोबत मानवी भावना जोडल्या गेल्या आहेत. मुळात पावसाची कल्पना वेगळी आणि त्यात चिंब होऊन आनंद मिळवणं वेगळं.

प्रेमात असणाऱ्यांना तर पावसाळा म्हणजे एक पर्वणी नानाविध कल्पना सुचतात आणि त्या शब्दात बांधण्याचा प्रयत्न होतो. शब्दांची गुंफण चांगली जमली असेल तर त्याला सूर आणि ताल यातून संगीताचा साज चढवला जातो. एकूणच काय तर पाऊस अंगणात कमी आणि मनामनात आणि वहीच्या पानापानात आधिक पडतो.

त्याची ती आणि तिचा तो सोबत असतील तर छत्री बाजूला टाकून धुंद होत पावसात चिंब चिंब होणं आवर्णनीय ठरतं. त्यात असणारा गोडवा आणि प्रीतीची अनुभूती सहजरित्या समोर येते मात्र ज्यांच्या जोडीदार सोबत नाही त्याचं विरहगान पावसाच्या प्रत्येक सरीसोबत नव्याने बरसत असतं. प्रीतीची अनुभूती आणि सोबत्याची अनुपस्थिती पावसाच्या थेंबा सोबतच आसवांचा देखील पाऊस आणते आणि या विरहाची किनार असणारी गाणी अधिक लोकप्रिय आहेत कारण त्या स्थितीत राहणारे आपल्या भावनांचा प्रतिबिंब शब्दाच्या या आरशात बघत असतात.

आषाढ महिन्याचा पहिला दिवस एक निमित्त साधत महाकवी कालिदास यांनी केलेली रचना त्यामुळे शब्दांपलिकडचा प्रवास घडवते आणि म्हणतात ना

ही वैश्विक भावना जागवणारा दिवस अर्थात आषाढस्य प्रथम दिवसे.!

प्रशांत विजया अनंत दैठणकर
जिल्हा माहिती अधिकारी
बीड,मो.९८२३१९९४६६

आष्टी विधानसभा मतदारसंघात सागर आमले निवडणूक आखाड्यात उतरणार

आष्टी । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर येत्या काही महिन्यात विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजणार असून अनेकांनी तशी तयारी सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव झाल्यानंतर अनेक विरोधकही विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. त्यातच मराठा आरक्षणाचा लढा उभा करणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील समर्थक युवा नेते सागर आमले यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात दौरे सुरू केले असून ते विधानसभा निवडणूक लढणार असल्याचे संकेत दिले आहेत. सागर आमले हा युवा चेहरा मतदारसंघात निवडणुकीत उतरणार असल्याने युवकांमध्ये व विशेषता मराठा समाजामध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

सागर आमले हे आष्टी तालुक्यातील अंभोरा या गावचे लोकनियुक्त सरपंच असून मनोज जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक आहेत. जरांगे पाटलांच्या प्रत्येक लढ्यामध्ये ते हिरारीने सहभाग झालेले आहेत. त्यांनी पाटलांच्या प्रत्येक उपोषणात मोठा सहभाग नोंदला असून दिनांक ११ जुलै येथे बीड येथील होणाऱ्या शांतता रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला आहे व मराठा समाजाची भूमिका समजावून सांगून जनजागृती रॅलीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही करत आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीदरम्यान जरांगे पाटील यांचा आदेश पाळत मतदारसंघ पिंजून काढला होता.याच काळात जरांगे पाटलांची अंभोरा या ठिकाणी एक लाखापेक्षा जास्त जनसमुदायाची यशस्वी सभा ही त्यांनीच आयोजित केली होती. हीच सभा लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाचा पराभव करण्यासाठी निर्णय ठरली होती. अंभोरा या ठिकाणी लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी संपूर्ण बीड जिल्ह्यातील एक आदर्श ग्रामपंचायत बनवण्याचे काम केले आहे. याच अंभोरा गावामध्ये पिठाची गिरणी ,कुट्टी मशीन ,शुद्ध पाणी हे नागरिकांना ते मोफत देत आहेत. शंभर टक्के कर भरणारी ग्रामपंचायत असून या ठिकाणी अनेक विकासकामे त्यांनी स्वखर्चातूनही मार्गी लावली आहेत. नागरिकांचे गाव खेड्यामध्ये व ग्रामीण भागामध्ये सर्वात जास्त वाद हे बांध रस्त्याचे होतात त्यामुळे सागर आमले यांनी सरपंच होताच गावातील प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधावर जाण्यासाठीचा रस्ता स्वखर्चातून तयार करून दिला आहे. मराठा आरक्षणाच्या लढ्यामध्ये प्रत्येक ठिकाणी सहभागी होऊन जरांगे पाटील यांची भूमिका त्यांनी संपूर्ण मतदारसंघामध्ये पोहच केली आहे. मराठा समाजातील एक नवीन चेहरा आष्टी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने मराठा समाजामध्ये नवचैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.

शेतकरी कुटुंबातुन आलेला ऐन तिशितिला एक तरुण सागर आमले नगर शहरात जाऊन आपल्या मेहनतीच्या जोरावर आपला उद्योग उभा करतो आणि नावारुपास येतो तेव्हा कोरोना कळात ग्रामीण नागरिकांचे होणारे हाल पाहून कोरोना काळामध्ये कडा येथील सुयोग मंगल कार्यालया मध्ये ५० बेडचे मोफत कोविड सेंटर उभा केले.यामध्ये अनेकांना जीवदान देण्याचे पुण्याचे काम केले.आणि आपल्या माणुसकीच दर्शन घडवले. कोरोना काळामध्ये सागर आमले यांनी पायाला भिंगरी बांधल्यागत संपूर्ण मतदारसंघांमध्ये रुग्णांची काळजी घेतली त्याचप्रमाणे आवश्यक असणाऱ्या अनेक रुग्णांना अर्थसहाय्य करून रुग्णांना जीवदान देण्याचे काम केले.

वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांच्या हिताचे निर्णय घेणार -देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण कंपन्यांमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य श्रीकांत भारतीय यांनी तीनही वीज कंपन्यांमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांच्या समस्यांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री सतेज पाटील, भाई जगताप यांनी सहभाग घेतला. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांसंदर्भातील मागण्यांबाबत ८ जानेवारी आणि ९ मार्च २०२४ रोजी बैठका घेण्यात आल्या होत्या. यात वस्तुस्थिती अवगत करण्यात आली. राज्यात हरियाणा कंत्राटी कामगारांच्या बाबतीच्या धोरणासंदर्भात चर्चा होऊन त्या धोरणामध्ये कंत्राटी कामगारांना कुठेही कायम करण्याची शाश्वती देण्यात आलेली नाही व हरियाणा सरकारने लागू केलेले कायदे राज्यात अगोदरच लागू असल्याचेही अवगत करण्यात आले. कंत्राटी कामगारांच्या हितासाठी असलेल्या निर्णयांबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महावितरण व महापारेषण कंपनीमध्ये काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना नियमित सेवेतील प्रवेशाचा मार्ग सुकर करण्याकरिता त्यांच्या मागील अनुभवाच्या आधारे त्यांना सरळसेवा भरतीमध्ये प्रती वर्षे दोन गुण असे पाच वर्षांच्या अनुभवासाठी जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतात. याशिवाय महावितरण कंपनीने विहीत शैक्षणिक अर्हता नसलेल्या कंत्राटी कामगारांना विद्युत सहायक व उपकेंद्र सहायक या पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याकरिता तीन वर्षांचा अवधी दिला आहे. त्याचप्रमाणे महापारेषण कंपनीमध्ये कोणत्याही कंत्राटी कामगारास विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त नसल्यामुळे कमी करण्यात आल्याची बाब निदर्शनास येत नसल्याचे सांगितले. याशिवाय भरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कामगारांना जास्तीत जास्त प्रमाणात सामावून घेण्यासाठी मुख्य सचिवांसमवेत बैठकीमध्ये चर्चा करून मार्ग काढण्यात येत असल्याचे ते म्हणाले. कामगारांना कमीत कमी वेतन देताना त्यांना ६२ टक्के विविध भत्ते देण्यात येत असल्याचे सांगून वीज उद्योगाकरिता किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्वतंत्र अनुसूची उद्योग म्हणून किमान वेतन निश्चित करण्याची बाब विचाराधीन असून याबाबत चार महिन्यांत निर्णय घेऊ, असेही त्यांनी सांगितले.

सौ.विमल भरणे (पिंगळे) यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ पत्रकार जगदीश पिंगळे यांच्या ज्येष्ठ भगिनी सौ. विमल प्रकाश भरणे (पिंगळे) यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी पुण्यात निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, विवाहित मुलगा, विवाहीत मुली, नातू असा परिवार आहे.

मुंबईतील सर्व शासकीय रूग्णालयांमध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करणार-मंत्री उदय सामंत

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई शहरामध्ये महानगर पालिका, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून रूग्णालये कार्यरत आहेत. या रूग्णालयांमध्ये सद्यस्थितीत असलेल्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी मुंबईतील सर्व लोकप्रतिनिधींची पुढील आठवड्यात बैठक घेण्यात येईल. मुंबईतील सर्व शासकीय रूग्णालयांमध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्धतेसाठी शासन गंभीर असून आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सुचनेच्या उत्तरात दिली.

यासंदर्भात सदस्य कॅ. तमील सेल्वन यांनी लक्षवेधी सुचना उपस्थित केली होती. अधिकची माहिती देताना मंत्री श्री. सामंत म्हणाले, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय अर्थात सायन रूग्णालयाचा पुर्नविकास दोन टप्प्यात करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात ६१६ कोटीची निवीदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कार्यादेश देण्यात आले आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातील कामाचे १५०७ कोटी रूपयांची निवीदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या रूग्णालयाच्या व्यतिरिक्त नवीन जागेवर रूग्णालय बांधण्यात येत आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेले रूग्णालय सुरूच राहणार आहे. सायन रूग्णालयातील बाह्य रूग्ण विभागात दररोज ७ हजार रूग्णांची नोंदणी होते. मंत्री श्री. सामंत पुढे म्हणाले, सायन रूग्णालयात १००० कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, ३०० वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी व ४५० परिचारिका कार्यरत आहे. त्याशिवाय १५० परिचारिकांची नियुक्ती करण्यात येत आहे. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या मानकांनुसार रूग्णालयात डॉक्टरांची संख्या आहे. रूग्णालयास आवश्यक औषधांचा पुरवठा मध्यवर्ती खरेदी खात्यातून करण्यात येतो. यासाठी पालिका स्तरावर निवीदा प्रक्रिया अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तोपर्यंत जुन्या कंत्राटदारांकडून पुर्वीच्याच दराने औषधांची पुरवठा करण्यात येत आहे. निवीदा प्रक्रिया लांबण्याबाबत चौकशी करण्यात येईल. नायर रूग्णालयातील दोन सी. टी स्कॅन यंत्र खरेदी करण्याबाबत आजच आदेश देण्यात येतील. ज्या भागात हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करून बंद करण्यात आला असेल, सुविधा पुरविण्यात आल्या नसतील अशा ठिकाणी चौकशी करून कारवाई करण्यात येईल. केईएम रूग्णालयाला १०० वर्ष होत आहे. या रूग्णालयाच्या प्रस्तावावर शासन सकारात्मक निर्णय घेईल. त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले. या सुचनेच्या चर्चेत सदस्य सुनील प्रभू, अजय चौधरी, यामिनी जाधव, आदित्य ठाकरे, मनिषा चौधरी यांनी भाग घेतला.

पान १वरून...

पिकविम्याचे ३ हजार

सोयाबीनसाठी प्रति हेक्टरला ५ हजार याप्रमाणे प्रति शेतकरी दोन हेक्टर मर्यादेपर्यंत अनुदान जाहीर केले असून ते लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याचे मुंडे यांनी सांगितले. तसेच राज्यात बियाणे आणि खतांचा पुरवठा मुबलक करण्यात आला असून कोठेही तुटवडा झालेला नाही. यंदा ३ जुलैपर्यंत राज्यात ७१ टक्के पेरणी झाली असून खरीपाची उद्दिष्टापेक्षा १ कोटी हेक्टरवर अतिरीक्त पेरणी झाली असल्याचे मुंडे यांनी सांगितले. पुढे मुंडे म्हणाले, राज्यात यंदाही एक रुपयात पिकविमा योजना राबवली जाणार असून गेल्या वर्षी १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला आहे. त्यामुळे जी पेरणी झाली त्यातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्र पिकविमा कार्यकक्षेत आले आहे. आतापर्यंत राज्यात ६२.२३ लक्ष शेतकऱ्यांनी विमा भरला असून आणखी यात भर पडणार असल्याची ते म्हणाले.

सरकारचा डाव

जो निर्णय घेतला आहे. त्याचा आज मुलींना फायदा होत नाही आणि जर कोणाला लाभ झाला असेल तर त्यांनी येऊन सांगावे, असेही मनोज जरांगे बोलताना म्हणाले.

पीकविमा कंपन्यांकडून

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, मागासवर्गीय मुलांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न आहे, ओबीसी मुलांना ५ वर्षांपासून शिष्यवृत्ती दिली जात नाही. ओबीसी समाजाच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवायचे व शेतीपासून बरबाद करायचे हे काम भाजपा सरकार करत आहे. सरकारच्या अशा चुकीच्या धोरणाविरोधात आमचा लढा सुरु आहे. शेतकरी, ओबीसी, आदिवासी, एससी, एसटी समाजाच्या हितासाठी काँग्रेस पक्षाचा लढा आहे असेही यावेळी सांगितले.

मेंदू खाणाऱ्या अमीबान

अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या निवेदनात नागरिकांना अमीबिक मेनिंगोएन्सेफलायटीसबाबत सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. यापूर्वी २०१७ आणि २०२३ मध्ये केरळच्या किनाऱ्यावरील अलाप्पुझा जिल्ह्यात हा संसर्गजन्य आजार दिसून आला होता.

पीएम किसानचा हप्ता

मते आहेत. अपेक्षाही वेगवेगळ्या आहेत. शेतकरी पीएम किसानचा निधी वर्षाला १२ ते १५ रुपये करावा, अशी मागणी करत आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सरकारच्या निर्णयामुळेच जास्त नुकसान होते. त्याची भरपाई होत नाही. त्यामुळे पीएम किसानचा निधी वाढवा, अशी मागणी केली जात आहे. चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अर्थसंकल्प सादर होण्याची शक्यता आहे. या अर्थसंकल्पापुर्वी अर्थमंत्र्यांनी शेतकरी नेते, कृषी उद्योगांच्या बैठका घेतल्या. या बैठकांमध्येही पीएम किसानच्या निधित वाढ करण्याची मागणी करण्यात आली. पीएम किसानचा निधी किमान ८ हजार रुपये करण्यात यावा, अशी मागणी पुढे आल्याचे सांगण्यात येते. उद्योगांच्या प्रतिनिधींनीही ही मागणी केल्याची माहिती आहे. पण प्रत्यक्षात अशा शक्यता गेल्या वर्षभर व्यक्त केल्या जात आहेत. त्यामुळे सरकार प्रत्यक्षात निर्णय घेत नाही तोपर्यंत तरी स्पष्टता येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसह सगळ्यांचेच लक्ष केंद्राच्या अर्थसंकल्पाकडे आहे.

हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्रीपदी,

अटक झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांचे बंधू चंपाई सोरेन यांनी २ फेब्रुवारी, २०२४ रोजी झारखंडचे १२ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ५ महिन्यांनंतर हेमंत सोरेन यांची नुकतीच २८ जून,२०२४ रोजी तुरुंगातून सुटका झाली. त्यानंतर झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी बुधावरी (दि.४ जुलै) मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर सोरेन यांनी झारखंडचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांची भेट घेत सत्ता स्थापनेचा दावा केला. सोरेन झारखंडचे १३ वे मुख्यमंत्री म्हणून शपथबद्ध झाले आहेत. अशाप्रकारे राज्यात गेल्या २३ वर्षात तब्बल १३ मुख्यमंत्री झाले आहेत.

रामकृष्ण हरी शेतकरी

खुला बाजार सुरू झाला आहे आणि दरात मोठी घसरण झाली. प्रतिकिलोचे दर ३३० वरून १८० ते १९० रुपयांपर्यंत खाली आले होते. आता दरात हळूहळू सुधार होऊन ते २०५ ते २३० रुपयांपर्यंत आहेत; मात्र, हेच दर २६० ते २७० पर्यंत असल्याशिवाय दूध पावडर विक्री करणे कोणत्याही दूध संघाला परवडत नाही. त्यामुळे साठा करून ठेवावा लागत आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ०५ जुलै २०२४

निराधार योजनेचे अनूदान डिबीटी मार्फत वितरण होणार, तलाठ्याकडे माहिती जमा करावी-पाळवदे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

तहसील कार्यालया कडून वितरीत होणारे संजय गांधीनिराधार, श्रावण बाळ योजना अनुदान लवकरच डीबीटी मार्फत वितरण होणार आहे. या साठी लागणारी कागदपत्र आपले सज्जाचे तलाठ्या कडे तात्काळ जमा करावीत असे अवाहण नायब तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी केले आहे.

तहसील कार्यालया कडुन होणारेसंजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ वृध्दापकाळ योजना यांचे अनूदान लवकरच डी बी टी मार्फत वितरीत केले जाणार असुन या साठी लाभार्थी यांचे आधार कार्ड बँक पासबुक आयएफसी कोड इत्यादी माहिती तलाठी यांच्या मार्फत मागणी केलेली आहे तरी तात्काळ .तलाठी कार्यालयात हि माहीती सर्व लाभार्थी नी जमा करावी या साठी तहसील कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही मात्र ही कागदे तात्काळ जमा करावीत असे अवाहण या विभागाचे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी केले. आहे.

आ.क्षीरसागरांनी केली टुकूर बंधाऱ्यांसाठी २२० कोटींची मागणी

बीड । प्रतिनिधी

सर्वसाधारण चर्चासत्रात बुधवारी (दि.३) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघातील प्रमुख परंतु प्रलंबित असलेल्या मागण्या सभागृहात मांडल्या. याचवेळी त्यांनी बीड तालुक्यातील खांडेपारगाव टुकूर प्रकल्पावरील साठवण तलावाची किंमत मोठ्या प्रमाणात वाढल्याने याठिकाणी ९ कोल्हापूर टाईप बंधारे प्रस्तावित केलेली आहेत. यासाठी २२० कोटी रुपये लागणार असून ३९० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याचे सांगून यासाठी आ.क्षीरसागरांनी शासनाकडे निधीची मागणी केली.

बीड शहरातील पाणीपुरवठ्याचा मुलभूत प्रश्न मुलभूत आहे. केवळ नगरपरिषदेकडे महावितरणची ३६ कोटी थकबाकी असल्याने नवीन पाणीपुरवठा योजनेस वीज कनेक्शन मिळत नाही आणि परिणामी पाणीसाठा मुबलक असूनही बीड शहराला १५-२० दिवसाला पाणी मिळत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने आदेश दिले असून या आदेशात, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी जिल्हाधिकारी व महावितरणचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन हा गंभीर प्रश्न असून यावर, ताबडतोब वीजबिल भरण्या संदर्भात उपाययोजना कराव्यात. असे म्हटले आहे. याबाबत नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव यांना आदेशित करून, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, जिल्हाधिकारी व महावितरणचे अधिकारी यांची बैठक घेण्यात यावी व राज्य सरकारने वीजबीलाचा काही भाग भरण्याचा लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी वारी (दि.३) रोजी पावसाळी अधिवेशनातील सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चासत्रात केली. यासोबतच बीड मतदारसंघातील प्रमुख प्रलंबित असलेले विषय आ.क्षीरसागर यांनी सभागृहात मांडले.

अर्थसंकल्पाच्या चर्चासत्रात आ.क्षीरसागरांनी खालील विषय मांडले

- बिंदुसरा नदीवर निम्न पातळी बंधारा बांधणे

या बंधार्याकरीता, सदरील कामांचे सर्वेक्षण होऊन रितसर प्रस्ताव संकल्पन प्रस्ताव यथोचित मान्य करण्यात आलेला आहे. तसेच बिंदुसरा नदीवरील निम्न पातळी बंधारा या योजनेसाठी ९५ टके विश्वासर्हतेने ३.२३ दलघमी येवा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र आहे. तसेच या प्रकल्पास आवश्यक (०.३५ दलघमी पाणी वापरामुळे कोणताही परिणाम दिसून येत नाही. तरी, मध्य गोदावरी खोरे लवादानुसार पाणी वापर सुत्रानुसार प्रत्यक्ष पाणी वापर परगणित केल्यानुसार उपलब्ध होणाऱ्या मंजुर २.८० अब्ज घनफुट () शिलक पाण्यामधुन या बंधाऱ्या करिता विशेष बाब म्हणुन सिंचनासाठी ०.३५ दलघमी पाणी वापर प्रस्तावित केलेला आहे. या सर्व बाबींचा विचार करून या योजनेस प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर करण्यात यावा. जेणेकरून बीड शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात येईल. व हा पुल कम बंधारा असल्याने या भागातील लोकांची दळणवळणाची सोय होईल.

शहरी भागातील घरपट्टी, नळपट्टीवरील व्याज माफ करा

१० नोव्हेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. दुष्काळी परिस्थिती असल्याने ग्रामीण भागात जमीन महसूलात सूट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे शहरी भागातील पाणीपट्टी व घरपट्टीवरील थकबाकीवर लावले जाणारे व्याज माफ करण्यात यावे.

बीड शहरातील रस्ते

बीड शहरामधील प्रमुख असलेले २५ ते ३० रस्ते रहदारी योग्य नसल्याने सदरील रस्ते करण्यासाठी शासनस्तरावरून नगरोत्थान किंवा इतर योजनेमधुन निधी व मंजुरी देण्यात यावी. अशी मागणी आ.क्षीरसागर यांनी केली. दरम्यान याविषयी मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव, मा.प्रधान सचिव नगर विकास विभाग, प्रशासक व मुख्याधिकारी,नगर परिषद बीड यांच्याकडे वेळोवेळी पत्र व्यवहार केला असल्याचेही आ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

टुकूर (खांडेपारगाव) साठवण तलाव प्रकल्प

टुकूर (खांडेपारगाव) साठवण तलाव प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश सन २००३ मध्ये दिले आहेत. त्यावेळेस त्या प्रकल्पाची किंमत भुसंपादनासह १५ कोटी रूपये होती.आज ती किंमत ३५० कोटी रूपयांच्या दरम्यान आहे. टुकूर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी होत असलेल्या विरोधामुळे ऑगस्ट २०२१ मध्ये साठवण तलावाच्या ऐवजी कोल्हापुरी बंधारे धेणे बाबत सुचित केले होते. एकूण नऊ बंधारे या प्रकल्पाऐवजी होत आहेत. बंधाऱ्याचा पाणीसाठा १.७४ दलघमी होत आहे. सिंचन क्षेत्र ३९० हेक्टर होणार आहे व त्यासाठी २२० कोटी रूपये लागत आहेत. सदरील बंधारे नाळवंडी, खांडेपारगाव, अंथरवणपिंप्री, उमरी, उमरद, नागापुर,बहाणपुर, भाटसांगवी असे एकूण ९ ठिकाणी प्रस्तावित आहेत. या कामासाठी निधी मंजूर करण्यात यावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व अभ्यासक्रम अंमलबजावणी यावर व्याख्यान संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २ जुलै रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामार्फत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार लागू करण्यात आलेल्या पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी या विषयावर अतिथी व्याख्यान संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. अतिथी व्याख्याता म्हणून बीडच्या सौ. के. एस. के. महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख डॉ. शंकर राऊत उपस्थित होते.

विद्यापीठाच्या मानव्यविज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अध्ययन या विविध अभ्यासशाखांच्या पदवीच्या प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षापासून संलग्नित महाविद्यालयांमध्ये लागू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना विविध विषयांची निवड करण्यासाठी कसे मार्गदर्शन करावे याविषयी डॉ. शंकर राऊत यांनी उपस्थित प्राध्यापकांना सविस्तर मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षण व्यवस्थेसह कौशल्याधारित शिक्षण अभ्यासण्यासाठी उपलब्ध झालेले आहे. तसेच प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती याचा देखील अभ्यास करता येणार आहे. या धोरणामुळे मुक्त शिक्षण या संकल्पनेस प्रोत्साहन मिळणार असून विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विषय निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहेअसे प्रतिपादन डॉ. राऊत यांनी याप्रसंगी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले. व्याख्यानास वरिष्ठ विभागाचे प्राध्यापक उपस्थित होते.

माजलगाव तालुक्यातील अनेक कारागिरांनी जपली पारंपरिक बाज विणण्याची कला

ग्रामीण भागात आजही झोपणे, बसण्यासाठी वापरली जाते बाज

ज्योतिराम पाढंरपोटे । माजलगाव

ग्रामीण भागात ज्या काळात आधुनिक सुविधा उपलब्ध नव्हत्या, त्या काळात पारंपरिक वस्तू, साहित्य आणि लाकडी सामान वापरून जीवनाचा आनंद घेतला जाई. आज आधुनिक साधने उपलब्ध झाल्याने या कला लोप पावत असल्या तरी माजलगाव तालुक्यातील अनेक कारागीरांनी बाज विणण्याची कला मात्र जपून ठेवली आहे.ग्रामीण भागातील अनेक कारागीरांनी विणलेल्या बाजेला आजही मागणी आहे.

गेल्या अनेक पिढ्यांपासून ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने निर्माण केलेली साधने वापरून जीवनाचा आनंद घेतला जाई. बदलत्या काळात अनेक शोध लागत गेले आणि लाकडाची जागा प्लास्टिक,लोखंड आदी धातूंनी घेतली.यामुळे घरातील लागणाऱ्या वस्तू या धातूपासून सहज आणि कमी किमतीत उपलब्ध होऊ लागल्या.यामुळे लाकडी सामान, दगडी वस्तू दुर्मीळ होत गेल्या.असे असले तरी माजलगाव तालुक्यातील अनेक ठिकाणी जुने कलाकार आजही या कला जिवंत ठेवण्यात गुंतले आहेत.यास फार मोठी मागणी नसल्याने उत्पन्नही मिळत नाही.मात्र, कला जपणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवत कलेतील आनंद ते दाखवून देत आहेत.या पारंपरिक कलेमध्ये झोपण्यासाठी लागणारी बाज (खाट) विणणे ही देखील एक कलाच आहे.ही कला ग्रामीण भागात आजही जोपासली जात आहे.

अनेक पिढ्यांपासून वापर

गावागावांत गेल्या अनेक पिढ्यांन पिढ्या या लाकडी खाटांचा वापर केला जात आहे.चार पायाची ही खाट दोरीच्या साहाय्याने विणली जाते.सुती दोर याकरिता वापरला जातो.सुती दोर आणि लाकडी सांगाडा यातून या बाजेची निर्मिती होत असते.ग्रामीण भागातील हे कारागीर गेल्या ४० वर्षांपासून बाज विणण्याचे काम माजलगाव तालुक्यात करत आहेत.महिन्याला दहा ते १५ खाटा विणल्या जातात. एका विणकामासाठी पूर्वी ५० रुपयांपासून बाज विणकाम सुरू केले.सध्या मात्र ५०० रुपये आकारले जात असल्याचे बाज विनणाऱ्या कारागिरांनी सांगितले.

ग्रामीण कारागिरांचे व्यवसायाबरोबर कला जपण्याचं काम

चार इंच आणि दोन इंच अशा दोन प्रकारांत खाटा विणल्या जातात. बदलत्या काळात आता पत्रापट्टीच्या खाटा आल्या आहेत.यात देखील बदल होत आता लाकडी बेड प्रकार आले.यामुळे बाजेला मागणी कमी होत गेली. ग्रामीण भागात आजही या बाजेला मागणी आहे.गावागावांत या बाज आज देखील शेतावर किंवा घराघरांत दिसून येतात.यामुळे ग्रामीण भागातील कारागिरांकडे महिन्याला किमान पाच तरी बाज विणकाम करण्यास येतात.यातून फार मोठी कमाई होत नसली तरी सोबतच्या व्यवसायाबरोबर बाज विनकामातून कला जोपासण्याचे काम ग्रामीण भागातील कारागिर करत आहेत.

तरुणांनी उद्योग-व्यवसायातून स्वत:ची प्रगती साधावी -महंत दत्ता महाराज गिरी

गेवराई । प्रतिनिधी

जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व कठोर परिश्रमाच्या जोरावर कदम परिवाराने उद्योग व्यवसायात स्वत:चे नावलौकिक केले आहे. हॉटेल व्यवसाय करताना ग्राहकांची प्रामाणिक सेवा करण्याची भूमिका त्यांनी अंगिकारली आहे. अशोकराव कदम यांनी याद्वारे हॉटेल व्यवसायातून एक आदर्श उभा केला आहे. त्यांच्याप्रमाणेच इतर तरुणांनीही उद्योग-व्यवसायातून स्वत:ची प्रगती साधावी, असे आवाहन श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी यांनी व्यक्त केले.

बीड- जालना हायवे शेवगाव फाटा, जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव येथील हॉटेल जय भवानी नाष्टा सेंटरचा संत-महंतांच्या उपस्थितीत भव्य उद्घाटन

शुभारंभ संपन्न झाला. यावेळी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी बोलत होते . यावेळी पुरुषोत्तम देवा गुळजकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

गेवराई शहरापासून काही अंतरावर जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव येथील हॉटेल जय भवानी नाष्टा सेंटरचे सोमवार दि.१ जुलै रोजी संत-महंतांच्या उपस्थितीत उद्घाटन शुभारंभ पार पडला शुभारंभ प्रसंगी शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे, ऋषीकेश बेदरे , सरपंच रामेश्वर जगताप, माजी सरपंच सखाराम मुंगुटराव , उपसरपंच सर्जेराव मुंगुटराव, भाऊसाहेब गोंजारे, सतिश देशमुख , सुधाकर हाकाळे, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार, पत्रकार विनोद नरसाळे, अमोल वैद्य, विनोद पौळ, सुशील टकले, भाऊसाहेब माखले, गुजर सर, ढाकणे सर, अशोक टापरे, चत्रभूज राऊत, विठ्ठल सुरवसे, शब्बीर पठाण , प्रा.जाधव , अशोक जाधव, अमोल अरड ,पंकज पुजदेकर, संदिप माखले, संकेत गांगुर्डे ,ओमकार पाठक , भागवत दहिवाळ, दत्ता सुळ, ऋषीकेश राऊत, गणेश सुळ, पुरुषोत्तम चोरमले , अभिमन्यू ठोंबरे, गोवर्धन सुळ, धर्मराज शिंगाडे, अशोक बोरकर, अंगद ढाकणे, शुभम राजगुडे, कालिदास गिरी , हबिब शेख यांच्यासह आदींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांचे बबनराव कदम, अशोकराव कदम, गंगाधर कदम, शुभम कदम, चक्रधर कदम, संदिप मदने, अवधूत कदम यांनी स्वागत केले.

नगरसेवक विजय शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक विजय शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मूकबधिर विद्यालय माजलगाव येथील दिव्यांग मुलांना शैक्षणिक साहित्य व नाष्टा वाटप करण्यात आले.

वाढदिवस म्हटलं बॅनरबाजी फटाके तोफा डीजे आधी आवं तर खर्च केला जातो परंतु शहरातील शिवाजीनगर भागाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक विजय शिंदे यांच्या मित्र परिवाराने अवांतर खर्चाला फाटा देऊन वाढदिवसानिमित्त मूकबधिर विद्यालयातील दिव्यांग मुलांना नाष्टा व अत्यावश्यक शैक्षणिक साहितयामध्ये प्रत्येकी अर्धा डझन वह्या,पेन,पेन्सिल इत्यादीचे वाटप करण्यात आले, यावेळी विजयदादा मित्र मंडळ शिवाजी नगर व अमोल गिरी मित्रमंडळ जिजामाता नगर व मित्रमंडळ यांच्या तर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक थळपती ए.एम.व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पान ६ वरून...

सोयाबीनवरील क्लोरोसिस

कोळपणी करून घ्यावी किंवा आंतरमशागत करणे शक्य नसल्यास सोयाबीन पिक १८ ते २२ दिवसांचे असेपर्यंत उगवण पश्चात तणनाशक इमाझीथापियर ३५% अधिक इमाझामॉक्स ३५% डब्लूजी हे पूर्वमिश्रित तणनाशक ४० ग्रॅम किंवा प्रोपॅक्यूझॅफॉप २.५% अधिक इमॅझीथीपायर ३.७५% हे पूर्वमिश्रित तणनाशक ८०० मिली २०० लिटर पाण्यात मिसळून एक एकर क्षेत्रावर फवारणी करावी. सोयाबीन पिकामधील कीड-रोग व्यवस्थापनासाठी थायोमेथॉक्झाम (१२.६%) अधिक लॅम्डासायहॅलोथ्रीन (९.५%) झेड सी १० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के २० मिली यासोबत कार्बेन्डाझिम १२% अधिक मॅन्कोझेब ६३% डब्लूपी या बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यातून फवारणी करावी तसेच तणनाशक कीटकनाशके यांच्या एकत्र फवारण्या करू नये त्याचप्रमाणे फवारणी करतांना सुरक्षा साधने वापरून फवारणी करण्याचा सल्ला ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी दिला आहे.

आरोग्य सहाय्यिका बीजूताई

माझ्या सेवेत एक घटना नेहमी मला प्रेरणा ऊर्जा देत असते. आरोग्य सेवा ही जनसेवा अर्थात ईश्वरसेवा मानूनच मी ते व्रत केले . आरोग्य अधिकारी, सहकारी वर्गाचे खूप सहकार्य मिळाले.माझ्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व जनता जनार्धनाचे खूप सहकार्य मिळाले. मी त्यांना जे सांगत असायचे त्याबाबतीत ती माणसं माझ्या विचारांना स्वतःच्या कृतीत आणत असायची याचा मला खूप अभिमान आहे. ''सेवा परमो धर्म'' या ऊक्तीचा उपयोग थोडा का होईना मला माझ्या संपूर्ण कार्यकाळात कृतीत आणता आला याचाही अभिमान वाटतो. सामान्य माणसाचे जीवन व हलाखीची परिस्थिती यामधून त्यांना जी काही यथायोग्य सेवा देता आली ती मी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला,असे मत माध्यमांशी बोलताना त्यांनी व्यक्त केले. ३ जुलै २०२४ या दिवशी सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार येथे त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पार पडला. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून चालू असणाऱ्या योजना लोकांपर्यंत पोहोच करणे,लसीकरण,साथीच्या रोगतील जनजागृती,कुटुंब नियोजन,शाळा भेटी देऊन मुलांची आरोग्य तपासणी यांसारख्या सर्व सेवा प्रामाणिकपणे देण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे-शिरसाट या सेवेतून निवृत्त होत आहेत.एका प्रामाणिक व्यक्ती कडून मिळणारा स्नेह थांबला याबाबत अनेक लोकांच्या मुखातून त्यांची उणीव नक्की भासेल असे उद्गार व्यक्त होत आहे. सेवापुर्ती कार्यक्रम प्रसंगी इंदुवासिनी देवस्थान पिंपळनेर चे श्री १००८ महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद महाराज,श्री सिद्धेश्वर संस्थान शिरूरचे श्री विवेकानंद शास्री महाराज, खंडोबा देवस्थान लोणीचे यादव महाराज बडे,श्री नागनाथ देवस्थान मानूरचे श्री ष ब्र १०८ विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज इत्यादीं संत-महंत व प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व अधिकारी,कर्मचारी, ढाकणे-शिरसाठ कुटुंबाचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आवर्जून उपस्थित डॉ.लक्ष्मीकांत तांदळे,डॉ.अशोक गवळी,डॉ.राजेश तांदळे,डॉ.मृणाली घुगे,डॉ.पूजा मस्के, डॉ सुहास खाडे, डॉ गव्हाणे मॅडम, डॉ परमेश्वर बडे, डॉ राहुल सानप सर, डॉ.राठोड सर,सर्वांनीच आदरणीय बीजूताई ढाकणे-शिरसाठ यांना पुढील आरोग्यमय जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या....!!

'डॉक्टर्स डे' निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉक्टर्स डे '' च्या निमित्ताने आय एम ए आंबेजोगाई, ॲम्पा, लॅब असोशियन, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व भुतडा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत विविध प्रकारच्या सामाजीक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सांस्कृतीक समितीच्या अध्यक्षपदी अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ राजेश इंगोले यांची दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल त्यांचा संघटनेच्या वतीने सहृदय सत्कार करण्यात आला. तसेच सांस्कृतीक समितीच्या मध्यवर्ती कार्यकारणीवर निवड झाल्याबद्दल डॉ योगेश मुळे, डॉ प्रज्ञा किनगावकर व डॉ विजय लाड यांचाही सत्कार करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाईच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कल्याण काळे सचिव धनराज सोळंकी व तर रोट्रॅक्ट च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ऋषभ कर्णावट

यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी वैभव गायके या विद्यार्थ्याने वैद्यकीय प्रवेश परीक्षा पास होऊन नेत्रदीपक यश मिळवल्याबद्दल त्यास आय एम ए तर्फे शैक्षणीक साहित्य देण्यात आले. यावेळी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, डॉ राजेश इंगोले, डॉ अनिल भुतडा,, डॉ अरुणा केंद्रे, यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी ३१ रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले. डॉक्टर्स डे निमित्त लोखंडी सावरगाव येथील उमेन्स हॉस्पिटलला वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.सत्काराला उत्तर देताना डॉ राजेश इंगोले यांनी इंडीयन मेडिकल असोसिएशनचा महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतीक समितीचा अध्यक्ष म्हणून निवड हा समस्त अंबाजोगाईकरांचा सन्मान आहे आणि या वाटचालीत आय एम ए अंबाजोगाईच्या स्थानिक शाखेचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे या शब्दात आपली कृतज्ञता व्यक्त केली. मिळालेल्या प्रत्येक पदाचा संघटनेच्या आणि डॉक्टर्सच्या हितासाठी उपयोग करून देईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी उपस्थिततांना दिली. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ नवनाथ घुगे तर आभार प्रदर्शन डॉ अरुणा केंद्रे यांनी केले. कार्यक्रमासाठी रोटरी चे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोलंकी, उपाध्यक्ष अजित देशमुख, स्वप्नील परदेशी, गणेश राऊत, प्रा. रोहिणी पाठक, डॉ अतुल शिंदे, संतोष मोहिते, विवेक गंगणे सर, अनंत कर्णावट, डॉ निलेश तोष्णीवाल, डॉ श्रीनिवास रेड्डी ,डॉ बळीराम मुंडे, डॉ जुबेर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कर्जमुक्ती करुन सातबारा कोरा करा

शेतकरी लिहणार थेट राष्ट्रपतींना पत्र, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा पुढाकार

सरकारनं शेतकऱ्याला कर्जमुक्ती करुन त्याचा सातबारा कोरा करावा अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. या मागणीसाठी सर्व शेतकरी थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहणार आहेत. यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं पुढाकार घेतला आहे. सरकारचं धोरण, डिझेल, खते किटकनाशके यांचा खर्च वाढत चालला आहे. यामुळं शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढत असल्याचे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे.

सरकारच्या शेती संदर्भातील धोरणावर टीका

शेतीमालाचे भाव कमी होण्याचे कारण म्हणजे सरकारने घेतलेले निर्णय सरकारचे आयात निर्यातीचे धोरण. उदाहरणार्थ कांदा निर्यातीवर बंदी घातली कांद्याचे दर पडल्याने कांदा उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला. बाहेरच्या देशातून सोयाबीन पेंड व पामतेल आयात केल्याने सोयाबीनचे दर पडले. सोयाबीन उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला. दुध पावडर आयात केल्याने दुधाचे भाव कमी झाले आहेत. सरकारने मका आयात करु लागल्याने मक्याचे दर ढासळले आहेत. यामुळं मका उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. साखर निर्यातीवर बंदी घातल्याने प्रति टनास ८०० रुपयाचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा तोटा झाला आहे. यामुळेच शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढल्याचे राजू शेट्टी म्हणाले.

चा बोजा शेतकऱ्यांवर

कापूस आयात केल्याने कापसाचा भाव पडला आहे. तांदळाच्या निर्यातीला बंदी घातल्यामुळं धानाचे भाव कमी झाले आहेत. रासायनिक खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेती औजारे याच्या माध्यमातून १२ टक्यापासून ते २२ टक्यापर्यंत जी. एस. टी चा बोजा शेतकऱ्यांवर पडतो. मात्र, परतावा शेतकऱ्यांना मिळत नाही. डिझेल आणि रासायनिक खतांच्या किमती नियंत्रीत ठेवणे सरकारचे काम होते पण ते सरकारने केले नाही असं राजू शेट्टी म्हणाले.

राष्ट्रपतींना देण्यात येणाऱ्या पत्रात नेमका उल्लेख काय असणार?

शेतकऱ्यांना वारंवार अतिवृष्टी , गारपीट , वादळ , अवकाळी पाऊस यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणजे शेतीमध्ये मी गुंतवलेली रक्कम आणि शेतीमाल विकून मला मिळालेली रक्कम याच्यामध्ये आरिष्ट दुरावा तयार होत आहे. त्यामुळे शेतीसाठी काढलेले कर्ज मी फेडू शकलो नाही. रोजगार निर्माण करतो याचा बहाणा दाखवून देशातील उद्योगपतींनी राष्ट्रीयकृत बँकेतून लाखो कोटीची कर्जे उचलली व गेल्या १० वर्षात काही मूठभर उद्योगपतींचे व्यवसाय तोट्यात गेल्याने १४ लाख ३५ हजार कोटीची कर्जे राईट ऑफ करण्यात आली. तोच न्याय मला का लावला जात नाही असे राष्ट्रपतीला देण्यात येणाऱ्या निवेदनात म्हटलं आहे.

संविधानाने या देशातील प्रत्येक नागरीकाला समान अधिकार दिले आहेत. मग कर्ज फेडता येत नाही म्हणून मीच का आत्महत्या करावी. तेंव्हा माझेही कर्ज राईट ऑफ करून मला या कर्जातून मुक्त करावे. व यापुढे मला पुन्हा माझी शेती तोट्यात जाऊ नये म्हणून किमान हमीभाव गॅरंटी कायदा संसदेमध्ये पारित करावा म्हणजे पुन्हा पुन्हा मला कर्जबाजारी व्हावे लागणार नाही, असं देखील निवेदनात म्हटलं आहे.

सोयाबीन पिवळे पडत असल्यास हे उपाय करा

यावर्षी मान्सून वेळेवर आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केलेली आहे. परंतु मोजकाच पाऊस पडून त्यानंतर पावसाची उघडीप झाली आहे. ढगाळ वातावरणामुळे सोयाबीन पिवळे पडण्याची समस्या निर्माण होते. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी यामागील कारणे आणि त्यावर होणारे उपाय याबाबत शिफारस केलेली आहे.

सोयाबीन पिवळे पडण्याची कारणे : जमिनीतून अन्नद्रव्य न घेता आल्यामुळे सोयाबीन सुरवातीलाच रोप अवस्थेतच पिवळे- पांढरे पडते. लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे सोयाबीनच्या झाडामध्ये ''क्लोरोसिस'' लक्षणे निर्माण होतात. क्लोरोसिस ही एक शारीरिक विकृती आहे. क्लोरासीस ही जमिनीत लोहाच्या (फेरस) कमतरतेमुळे होत नसून ती काही कारणाने झाडांद्वारे लोह शोषण न केल्याने होते. लोहाची कमतरता विशेषत: कमी प्रमाणात निचरा होणाऱ्या चुनखडीयुक्त जमिनीत होते. वनस्पतींमध्ये हिरवे रंगद्रव्य- क्लोरोफिल तयार करण्यासाठी लोह (फेरस) आवश्यक असते. बहुतेक जमिनीत वनस्पतींच्या आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात लोह असते. बऱ्याचदा जमिनीचा सामू ७.५ पेक्षा जास्त असतो त्या जमिनीतील लोह फेरस या उपलब्ध स्थितीत न राहता फेरीक स्वरूपात जातो आणि तो पिकांना शोषून घेता येता नाही. त्यामुळे पिकावर लोहाची कमतरता दिसते. तसेच जमिनीत मुळांना ऑक्सिजन पुरवठा कमी झाल्याने देखील मुळाद्वारे लोह कमी शोषला जाऊन क्लोरासीस होतो.

सोयाबीन क्लोरोसिसची लक्षणे : लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता सर्वप्रथम कोवळ्या पानांवर दिसून येते. हरितद्रव्याच्या अभावामुळे पानांच्या शिरांमधील भाग पिवळा पडतो आणि शिरा फक्त हिरव्या दिसतात. सोयाबीनचे प्रथम ट्रायफोलिएट पाने हिरवी राहतात कारण लोह हे अन्नद्रव्य अचल (वाहू न शकणारे) आहे. लोह रोपट्यात स्थिर होऊन साठविली जाते. म्हणूनच, नवीन पानांमध्ये लक्षणे दिसतात. पाने पिवळी पडल्यामुळे हरितद्रव्य कमी होऊन प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते, वाढ खुंटते आणि उत्पादनही कमी येते.

व्यवस्थापन : पाण्याचा ताण पडल्यास तुषार सिंचनाच्या सहाय्याने संरक्षित पाणी द्यावे. ज्या ठिकाणी पाऊस जास्त झालेला असेल अशा शेतात वाफसा स्थिती निर्माण होण्यासाठी अतिरिक्त पाणी साचले असेल ते काढण्याची सोय करावी. वापसा आल्यानंतर पीक ३०-३५ दिवसांचे होण्यापूर्वी एक कोळपणी करावी. ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली +१९:१९:१९ खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास ८-१० दिवसांनी परत एकदा फवारणी करावी.

सुपर नेपियर गवत चारा देवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणार

उसासारखे दिसणारे सुपर नेपियर गवत शेतकरी तसेच पशुपालकांमध्ये खूप लोकप्रिय होत आहे. सुपर नेपियर गवत मूळचे थायलंडचे आहे. याला ग्रामीण भाषेत हाती गवत असेही म्हणतात. ती सर्व पोषक तत्वे या गवतामध्ये असतात, जी दुभत्या जनावराला अन्नाच्या स्वरूपात द्यायला हवीत. सुपर नेपियर गवताचे सेवन केल्याने जनावरांमध्ये दूध उत्पादन वाढते, परंतु हे हिरवे गवत जनावरांच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. जास्त पाऊस पडणाऱ्या किंवा कोरडवाहू भागातही याची लागवड करता येते. शेतकऱ्यांना हवे असल्यास ते शेतातील बांधावर सुपर नेपियर गवताची लागवड करू शकतात.

पशुखाद्याचे संकट दूर होणार : सुपर नेपियर गवत म्हणजेच हत्ती गवत दुभत्या जनावरांची पोषक आहाराची कमतरता पूर्ण करते. पशुपालक देखील त्यांच्या गरजेनुसार नेपियर गवत वाढवू शकतात आणि त्याची व्यावसायिक शेती करून शेतकरी चांगले उत्पन्न मिळवू शकतात. सुपर नेपियर गवत भारतातील चारा संकटाचा सामना करणाऱ्या प्राण्यांना नवीन जीवन देऊ शकते.

जनावरांना मिळते पोष्टीक अन्न : तज्ञांच्या मते, सामान्य हिरव्या चाऱ्याच्या तुलनेत सुपर नेपियर गवतामध्ये १८-२० टक्के प्रथिने आणि ३५ टक्के क्रूड फायबर असते. एकदा नेपियर गवताची लागवड केली की ते पुढील ६-७ वर्षांसाठी पशुखाद्य उत्पादन देऊ शकते. नेपियर गवताचे उत्पादनही वेगाने मिळते. एकाच वेळी हे गवत १५ फूट लांबीपर्यंत वाढते. कमी सिंचनात, नेपियर गवत दर ५० दिवसांनी काढणीसाठी तयार होते. त्याची काढणी शेताच्या एका टोकापासून सुरू केली जाते आणि त्याची देठं वरती थोडीशी कापली जातात, ज्यामुळे मुळे उगवलेले कांड पुन्हा गवताचे उत्पादन देऊ शकतात.

नेपियर गवत कसे वाढवायचे : हिरवा चारा वाढवणे खूप सोपे आहे ज्यामुळे दुग्धोत्पादनासोबतच जनावरांची प्रतिकारशक्ती वाढते. त्याच्या पुनर्रोपणासाठी सर्वप्रथम शेताची खोल नांगरणी करून सपाटीकरणाचे काम करावे. शेवटची नांगरणी आणि सपाटीकरण करण्यापूर्वी शेतात कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळावे. यानंतर शेतात नेपियर गवताच्या मुळांची किंवा कलमांची ३-३ फूट अंतरावर पुनर्लावणी करावी. एकदा प्रत्यारोपण केल्यावर, दर ४०-५० दिवसांनी ताजे गवत तयार केले जाईल. एक एकर शेतात नेपियर गवताची लागवड केल्यास सुमारे ३०० ते ४०० क्विंटल हिरवा चारा उपलब्ध होतो. कापणीनंतर, त्याच्या फांद्या पुन्हा पसरू लागतात, त्याच्या चांगल्या उत्पादनासाठी, जीवामृत किंवा युरिया देखील शेतात शिंपडता येते.

लाल कंधारी गाय देते अधिक काळ दूध

ग्रामीण भागात शेतीनंतर पशुपालन व्यवसाय हा सर्वात चांगला आणि उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत मानला जातो. स्वत:ला आर्थिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासाठी शेतकरी शेतीसोबतच पशुपालनही करतात. पशुपालकांमध्येही, शेतकऱ्यांमध्ये गाय पाळणे सर्वाधिक लोकप्रिय आहे. गाय केवळ दूधच देत नाही तर शेतीसाठी शेणखतही देते, त्यामुळे शेतीचा खर्चही कमी होतो. त्यामुळे प्रत्येक वर्गातील शेतकऱ्यांचा कल गाय पालनाकडे वाढत आहे.

तुम्हीही गाय पाळण्याचा विचार करत असाल तर तुम्ही लाल कंधारी गाय पाळू शकता. लाल कंधारी गाय ही लहान शेतकऱ्यांसाठी अतिशय फायदेशीर गाय आहे, कारण तिची काळजी घेण्यासाठी फारसा खर्च येत नाही आणि तिला नेहमी हिरवा चारा द्यावा लागत नाही. गाईची ही जात चौथ्या शतकात कंदहारच्या राजांनी विकसित केली होती, असे मानले जाते. त्याला लाखलबुंडा असेही म्हणतात. तर लाल कंधारी गायीची प्रतिदिन ४ ते ५ लिटर दूध देण्याची क्षमता आहे. दुग्धोत्पादनाबद्दल बोलायचे झाले तर ही जात वर्षातील २७५ दिवस सतत दूध देते.

कंदहारी गायीचे मूळ : या जातीच्या गायीचे मूळ ठिकाण कंधार, नांदेड, जिल्हा महाराष्ट्र आहे. त्याला 'लाखलबुंडा' असेही म्हणतात. ही महाराष्ट्रातील नांदेड, परभणी, अहमदनगर, बीड आणि लातूर जिल्ह्यात आढळते. या जातीचे प्राणी मध्यम आकाराचे आणि गडद लाल रंगाचे असतात. ही जात हलक्या लाल ते तपकिरी रंगात येते. त्याची शिंगे वाकडी, कपाळ रुंद, कान लांब, कुबडा व लटकणारी त्वचा मऊ, डोळे चमकदार व पाठीवर गोल काळे डाग असतात. या जातीच्या नराची सरासरी उंची ११३८ सेमी आणि मादीची सरासरी उंची १२८ सेमी आहे. ही जात एका बछड्यात सरासरी ६०० ते ६५० किलो दूध देते, ज्यामध्ये चरबीचे प्रमाण ४.५ टक्के असते. पहिल्या बछड्याच्या वेळी, या जातीच्या मादीचे वय ३०-४५ महिने आणि तिचे एक बछडे १२-२४ महिन्यांचे असावे.

चाऱ्याची गरज : या जातीच्या गाईंना आवश्यकतेनुसार चारा द्यावा. शेंगांचा चारा देण्यापूर्वी त्यात भुसा किंवा इतर चारा घालावा. जेणेकरून पोट फुगणे किंवा अपचनाचा त्रास होणार नाही.

हिरवा चारा : बरसीम (पहिले, दुसरे, तिसरे आणि चौथे पीक), लुसर्न (सरासरी), चवळी (लांब आणि लहान प्रकार), गवारणा, सेंजी, ज्वारी (लहान, पिकलेले, पिकलेले), मका (लहान आणि पिकलेले), ओट्स, बाजरी, हत्ती गवत, नेपियर बाजरी, सुदान गवत इ.

कोरडा चारा : बरसीम गवत, ल्युसर्न गवत, ओट गवत, भुसभुशीत, कॉर्न कोंब, ज्वारी आणि बाजरीचा भुसा, उसाचे गवत, दुर्वा गवत, मक्याचे लोणचे, ओटाचे लोणचे इ.

शेडची गरज : प्राण्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी त्यांना अनुकूल पर्यावरणीय परिस्थिती आवश्यक असते. अतिवृष्टी, कडक ऊन, बर्फवृष्टी, थंडी आणि परजीवी यांपासून प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी शेडची आवश्यकता आहे. निवडलेल्या शेडमध्ये स्वच्छ हवा आणि पाण्याचा प्रवेश असल्याची खात्री करा. जनावरांच्या संख्येनुसार खाद्य साठवण्याची जागा मोठी आणि मोकळी असावी जेणेकरून त्यांना अन्न सहज खाता येईल. जनावरांचा कचरा ड्रेनेज पाईप ३०-४० सेमी रुंद आणि ५-७ सेमी खोल असावा.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१५०७ : इंग्लंड आणि नेदरलँड्स या दोन्ही देशांनी व्यापार करारावर आपली सहमती दर्शविली.
१६५९ : मुघल बादशाहा औरंगजेब यांनी दिल्ली येथे राज्याभिषेक केला.
१८४९ : डेन्मार्कने नवीन संविधान अंगिकारले व संवैधानिक राजेशाही कायम केली.
१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध-पीडमॉंटची लढाई दक्षिणेचा पराभव.
१९०७ : स्वामीनारायण पंथाची स्थापना.
१९१५ : डेन्मार्कमधे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.
१९२४ : अर्न्स्ट अलेक्झांडरसनने पहिला फॅक्स संदेश स्वतःच्या वडिलांना पाठवला.
१९५२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही सन्मान पदवी दिली.
१९५९ : सिंगापूरमधील पहिल्या सरकारची स्थापना झाली.
१९६८ : अमेरिकेच्या अध्यक्षपदचे उमेदवार रॉबर्ट एफ. केनेडी यांचा गोळी मारण्यात आली, पुढील दिवशी केनेडी मरण पावले.
१९७५ : १९६७ पासून आठ वर्षे वाहतूकीसाठी बंद असलेला 'सुवेझ कालवा' पुन्हा आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.
१९७४ : जागतिक पर्यावरण दिन
१९७७ : सेशेल्समधे उठाव झाला.
१९८० : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक व ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसचे एक संस्थापक नारायण मल्हार जोशी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.
१९८४ : अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांचा बीमोड करण्यासाठी भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधीने मंदिरावर हल्ला करण्याचा आदेश दिला.
१९८९ : चीनची राजधानी बिजींगच्या तियेनआनमेन चौकातील चळवळीदरम्यान एका अज्ञात निःशस्त्र व्यक्तीने रणगाड्यासमोर उभे राहून रणगाडा थांबवला. हे छायाचित्र या चळवळीचा मानबिंदू ठरले.
१९९४ : ब्रायन लारा यांनी नाबाद ५०१ धावा करून प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता ॲडॅम स्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१८७९ : नारायण मल्हार जोशी, भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक.
१८८१ : हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक गोविंदराव टेंबे यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)
१८८३ : ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)
१९०० : डेनिस गॅबॉर, हंगेरीयन, ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९०८ : कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया चे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)
१९४५ : अंबर रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४६ : विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.
१९५० : हरिश्चंद्र माधव बिराजदार, मराठी पहिलवानी कुस्तीगीर.
१९६१ : भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन यांचा जन्म.
१९७२ : भारतीय पुजारी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१० : अमेरिकन लघुकथा लेखक ओ. हेनरी यांचे निधन.
१९१६ : लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉय.
१९४२ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील प्रतिभाशाली गझल आणि गीत गायक मास्टर मदन यांचे निधन.
१९५० : कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर २०११)
१९७३ : मा. स. गोळवलकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक.
१९८७ : ग. ह. खरे, इतिहासतज्ज्ञ.
१९९६ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय यांचे निधन. (जन्म: २६ मार्च १९३३)
१९९९ : राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले यांचे निधन.
२००४ : अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे निधन. (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)
२०१६ : एलिनॉर झेलियट (अमेरिकन लेखिका आणि इतिहासकार, जन्म: ८ ऑक्टोबर १९२६).
२०१७ : भारतातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्र येथून सर्वात जास्त जड वजनी ''जीएसएलव्ही मार्क -३ डी -१'' रॉकेट? चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं.

धनगर, वडार आरक्षण उपोषणाकडे शासकीय यंत्रणेने फिरवली पाठ

उपोषणाचा सहावा दिवस : उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

बीड । प्रतिनिधी

धनगर व वडार जमतीचा एस्? टी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी भाई आकाश निर्मळ यांचे आमरण उपोषण २९ जून पासून बार्शी नाक्यावर सुरु असून आज उपोषणाचा सहावा दिवस असून प्रशासनाने जाणिवपूर्वक उपोषणाकडे पाठ फिरविली असल्याचे समाजामधून बोलले जात आहे. धनगर व वडार समाज आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून या भटक्या जातीच्या समावेश एसटी प्रवर्गात करावा अशी गेल्या अनेक दिवसापासून मागणी होत आहे .मात्र या मागणीला राज्य सरकार सकारात्मक प्रतिसाद देत नाही .

या मागणीला अधिक धार आणण्यासाठी भाई आकाश निर्मळ यांनी धनगर आणि वडार समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी अमर उपोषण सुरू केले असून ते गेल्या सहा दिवसापासून हे उपोषण चालू असून या उपोषणास भेट देण्यासाठी पुण्याच्या मावळा संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा व शेकापच्या नेत्या रुपाली पाटील व मध्यवर्ती कमेटी सदस्य भाई चंद्रशेखर नलावडे पाटील, राजेंद्र देवकर, सुरज पवार, तसेच पिपंळादेवीचे सरपंच दत्ता किवणे, प्रा. अमोल ढोरमारे, ऊबाठा शिवसेनेचे पिंपळनेर सर्कलचे युवानेते अंगद किवणे, राष्ट्रीय समाज पक्षाचे काकासाहेब कानाडे धनगर युवा सेनेचे अकोले तालुका अध्यक्ष संजय महानौर,कळमनुरी तालुका यशवंत सेनेचे अध्यक्ष ईश्वर कावळे, नांदेड राष्ट्रीय समाज नरेंद्र प्रभाळे, धनगर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जनजागृती मंचचे संस्थापक अध्यक्ष कोंडीबा वाघमोडे, डॉ. शितल चोरमले, बीड शहरातील स्वप्नील गलधर, उद्योजक बाबुलालसेठ ढोरमारे, पिंपरगव्हाणचे माजी सरपंच नारायण मतकर, पिपंळवंडीचे सामाजिक कार्यकर्ते केशव प्रभाळे, दत्ता कानाडे, कृष्णा काळे, पिपंळगांवचे धनगर समाजाचे कार्यकर्ते नारायण धापसे, वडार समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामलिंग गायकवाड यांच्यासह वडार व धनगर समाजाच्या विविध संघटनेचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते सर्व सामान्य धनगर व वडार समाज बांधव उपोषण स्थळी भेट देत आहेत. आमरण उपोषणाचा आज पाचवा दिवस उलटला तरी शासकीय यंत्रणेने गेंड्याची कातडी पांघरल्यामुळे अद्यापही शासकीय यंत्रणेतील प्रशासकीय अधिकारी या आमरण उपोषणाकडे साधा फिरकला नाही.जोपर्यंत धनगर आणि वडार समाजाला जोपर्यंत एस्? टी प्रवर्गाची आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही. तोपर्यंत उपोषण सोडणार नाही अशी माहिती भाई आकाश निर्मळ यांनी घेतला आहे.

लोकप्रतिनिधींना नाही सोयरसुतक

गेल्या सहा दिवसांपासून धनगर व वडार समाजाच्या एसटी आरक्षणासाठी भाई आकाश निर्मळ हे उपोषणाला बसलेले असून त्यांच्याकडे कुठलाही आमदार, खासदार यांनी येवून साधी चौकशीही कधी त्यांना करावीशी वाटलेली नाही. यावरून तर स्पष्ट दिसून येते कि बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील कुठल्याच लोकप्रतिनिधींना धनगर समाजाची आवश्यकता नाही..

..तर धनगर, वडार समाजही जागा दाखवेल : राजकीय आखाडे मांडवून उपोषण, आंदोलने करणारांचे लाड पुरवले जात असताना धनगर,वडार समाजाच्या आरक्षणाकडे शासन,प्रशासन व लोकप्रतिनिधींनी देखील पाठ फिरवली असली तरी येणार्या काळात समाज तुमचा हिशोब नक्कीच करणार असल्याच्या भावना दोन्ही समाजामधून व्यक्त होत आहे.

थोडक्यात

केज मतदार संघातून संदिपान हजारे यांना उमेदवारी द्यावी

केज : केज मतदार संघातून अनेक लोकांना आमदार करण्यामध्ये संदिपान हजारे यांचा सिंहाचा वाटा होता. सर्व थरातील थेट जनतेपर्यंत त्यांचे संबंध असल्याने जुने अनुभवी,जहाल पॅथर व्यक्ती महत्व आहे.गरीबीचे चटके सोसून लोकाना न्याय मिळवून देण्यासाठीसाठी अहोरात्र झटणारे खंबीर नेतृत्व हे केज मतदार संघाचा विकास केल्या शिवाय रहाणार नाहीत. म्हणून त्यांना पक्षाने उमेदवारी देऊन जनतेला न्याय मिळवून द्यावा असे अंकुश गंगावणे यांनी आव्हान केले आहे.

विविध कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

बीड : कृषी विभागामार्फत राज्यात कृषी आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणा-या, कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणा-या शेतक-यांचा तसेच कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणा-या व्यक्ती/संस्था/गट यांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभूषण पुरस्कार, सेंद्रीय शेती कृषीभूषण पुरस्कार, उद्यानपंडीत पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार , वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व कृषी विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. कृषी विभागामार्फत सन २०२३ या वर्षामध्ये कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्ती /गट / संस्था यांच्याकडून विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. तरी जास्तीत जास्त शेतकरी /गट / संस्था/ व्यक्ती यांनी विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव आपल्या जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत रविंद्र बिनवडे, भाप्रसे, आयुक्त (कृषी) महाराष्ट्र राज्य, यांनी राज्यातील शेतकरी/व्यक्ती /गट / संस्था यांना आवाहन केले आहे. विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव तयार करणेकामी, अधिक माहितीसाठी जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

कर्जदारांनी दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा

बीड : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या खादी आयोग निधी व कन्सोर्टियम बँक फायनान्स या दोन्ही योजनांसाठी मंडळाने खादी आयोगाचे परिपत्रक क्र. फायनान्स/ पॉलीसी/ १/२००२-०३ दि. २८/०२/२००३ व परिपत्रक क्र. अका/एमएमएच. केव्हीआयबी/२२-२३ दि.२९/४/ २०२२ अन्वये दंडव्याज माफी जाहिर केली आहे. बीड येथे प्रस्तुत योजनेचे थकीत कर्जदार आहेत. कर्जदाराने एकरकमी भरणा केल्यास दंडव्याज माफी संबधितांना लागू होणार आहे. तरी कर्जदारांनी या दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बीड यांनी केले आहे.

लिंबागणेश येथे भाविकांचा रास्तारोको; मठाधिपती यांना धमकी प्रकरण

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या नावाने राजकीय हेतूने प्रेरित होऊन सुडबुद्धीने सोशल मीडियावर संस्थानची बदनामी करत दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या हेतूने षडयंत्र रचुन बेलेश्वर संस्थान व मठाधिपती यांची जाणिवपूर्वक बदनामी करणा-या तसेच महंत तुकाराम महाराज यांना फोनवरून शिविगाळ करून मारहाण करण्याची धमकी देणाऱ्यांना तातडीने अटक करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.४ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील ईश्वरभारती मंदिरामध्ये श्रीफळ अर्पण करत बसस्थानक पर्यंत दिंडी काढत बसस्थानक येथे मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावर पंचक्रोशीतील भाविकांनी रास्तारोको आंदोलन केले.

यावेळी ससेवाडीचे आदिनाथ महाराज, अंजनवतीचे आनंदराव येडे महाराज,डॉ.गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे अंजनवतीकर, कृष्णा पितळे, विश्वंभर गिरी, नानासाहेब शिंदे यांनी संतप्त भावना व्यक्त करत यापुढे असले प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत प्रशासनाने आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाईची मागणी केली.

निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, तलाठी गणपत पोतदार यांना देण्यात आले.यावेळी लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, संतोष वाणी, विनायक मोरे, पांडुरंग वाणी,मुळुकचे सरपंच रामकिसन कदम,महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, पोखरी सरपंच बिभिषण मुळीक, बेळगावचे सरपंच अशोक जाधव,सोमनाथवाडीचे सरपंच किशोर शेळके, युवराज इंगोले,मान्याचा वाडा येथील योगेश चव्हाण, नागझरीचे नानासाहेब शिंदे, बेलखंडीचे अनिल माने,मसेवाडीचे तुळशीराम काटकर,राजेभाऊ कदम,फुकेवाडीचे अंबादास मानकर,बोरखेडचे आरूण काकडे,वाघि-याचे बाबुराव बावणे, गणेशनगरचे अशोक वायभट, कृष्णा वायभट आदि सहभागी झाले होते.

भाविक सहन करणार नाहीत- डॉ.गणेश ढवळे

सोशल मीडियावरून बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती महंत तुकाराम भारती महाराज यांच्या बद्दल शिविगाळ करत मारहाण करण्याची धमकी देणे हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरुपाचा असुन दोन समाजामध्ये वाद पेटवण्याचा प्रकार आहे. भाविकांच्या भावना तिव्र असुन अशा प्रकारणात तातडीने कठोर कारवाई आवश्यक असुन भविष्यात असा प्रकार खपवून घतला जाणार नाही.

डाक विमा सल्लागार भरती

बीड । प्रतिनिधी

बीड डाक विभागाकडून डाक जीवन विमा() पी एल आय आणि ग्रामीण डाक जीवन विमा () आर पी एल आय योजने अंतर्गत 'डायरेक्ट एजंट' (विमा सल्लागार) च्या भर्तीकरिता मुलाखती घेण्यात येणर आहे. सदरील अर्ज डाकघर कार्यालय बीड विभाग बीड येथे उपलब्ध आहेत.

पात्रता मापदंड- वयोमर्यादा उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी कमीत कमी १८ वर्षे जास्तीत जास्त वयोमर्यादा ची अट नाही. शैक्षणिक पात्रता अर्जदार १० वी उत्तीर्ण किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेले असावी, ज्यात केंद्रीय राज्य मान्यता प्राप्त घेतलेली आहे. बेरोजगार स्वयं रोजगार, माजी विमा सल्लागार, कोणत्याही विमा कंपनीच्या माजी युवा एजंट, माजी सैनिक, सेवानिवृत्ती शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ते, महिला मंडळ कार्यकर्ते, ग्राम प्रधान, ग्रामपंचायतीचे सदस्य इत्यादी टपाल जीवन विमा साठी थेट असे अर्ज करू शकतात. उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्वारे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, जीवन विमा बाबतचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान, स्थानिक भागाची माहिती इत्यादी अपेक्षित आहे. निवड झालेल्या उमेदवारास रुपये ५००० ची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून पोस्ट ऑफिस मध्ये ठेवावी लागेल. जी /च्या स्वरूपात असेल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर डाक विभागाकडून तात्पुरत्या स्वरूपात परवाना देण्यात येईल. ची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायम स्वरूपाच्या परवानामध्ये रूपांतरित केली जाईल. सदर परीक्षा ३ वर्षाच्या आत उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील. नियुक्ती लायसन्स तत्वावर आणि कमिशन तत्वावर राहील. इच्छूक उमेदवारांनी विहित नमून्यातील अर्ज भरुन दि. ८ जुलै २०२४ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी १६ या वेळेत अधीक्षक डाकघर, खडकपुरा बीड, विभाग बीड ४३११२२ येथे थेट मुलाखतीसाठी हजर राहावे. सोबत बायोडाटा, मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र घेऊन येणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी टपाल विमा विकास अधिकारी, मोरे, बीड विभाग, मोबाईल नंबर ८२०८५५७९५९ यांच्याशी संपर्क साधावा, असे अधिक्षक डाकघर बीड विभाग यांनी कळविले आहे.

अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीकस्पर्धा

बीड । प्रतिनिधी

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक-यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल या पिकांसाठी पीकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारिख मूग व उडीद पिकासाठी ३१ जुलै तसेच भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या पिकांसाठी ३१ऑगस्ट आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वत:च्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणा-या शेतक-याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. पिक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास स्वतःच्या शेतावर स्पर्धेकरिता सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या पिकाची भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पिक स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतक-यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. अर्ज कोठे करावा व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/ पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत. बक्षिसाचे स्वरूप- सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील पीक निहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षीस रक्कम पुढीलप्रमाणे आहे. स्पर्धा पातळी सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये पहिले दुसरे तिसरे तालुका पातळी ५,००० ३,००० २,००० जिल्हा पातळी १०,००० ७,००० ५,००० राज्य पातळी ५०,००० ४०,००० ३०,००० खरीप हंगाम सन २०२४ पिकस्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी सहभाग घ्यावा, या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन रविंद्र बिनवडे, भाप्रसे, आयुक्त (कृषी) महाराष्ट्र राज्य,यांनी केले आहे.

उपोषणास बसलेल्या युवकांची जीवितहानी झाल्यास सरकार जबाबदार-दत्ता वाकसे

बीड/प्रतिनिधी

या राज्यांमधील धनगर समाजाच्या मुख्य मागणीसाठी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील सारणी येथे ३०० फूट उंचीच्या पाण्याच्या टाकीवर धनगर समाजातील युवकांनी उपोषण चालू केले आहे गेल्या तीन दिवसापासून ते उपोषणासाठी बसलेले आहेत परंतु सरकार प्रशासन कुठल्याही प्रकारचे दखल घ्यायला तयार नाही या युवकांची काही जीवितहानी झाली तर शासन प्रशासन व सरकार जबाबदार राहील हे लक्षात घ्यावे अन्यथा आगामी काळात तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल असे त्या ठिकाणी भेटीदरम्यान मनोगत व्यक्त करताना शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी सरकारला इशारा दिला आहे

पुढे ते बोलताना म्हणाले की सध्या परिस्थिती पाहिली तर भारतीय संविधानाने धनगर समाजाला न्याय दिलेला आहे त्यांना घटनेमध्ये धनगर ओरान असा समाविष्ट एसटीच्या ४७ नंबर असलेल्या त्यापैकी ३६ नंबरवर समावेश केलेला आहे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या समाजाला पूर्वीपासूनच न्याय दिलेला आहे हा समाज दर्याखोऱ्यामध्ये फिरणारा मेंढपाळ व्यवसाय करणारा समाज आहे आणि स्वतःची उपजीविका मेंढी पालन व्यवसाय करून भागवत आहे या समाजामध्ये आजही १८ दारिद्र्य युवकांच्या पाचवीला पुजलेले आहे हा समाज अतिशय मागास म्हणून महाराष्ट्रामध्ये ओळखला जातो या राज्यामधला दोन नंबरचा समाज म्हणून धनगर समाजाकडे पाहिले जात परंतु आज वाहतहात पाहता समाज भरकटला जात आहे समाजातील मोठ्या मोठ्या दलालांनी समाजाचा नुकसान करायचं ठरवलं आहे काय? समाज कोणाचे तरी दावणीला बांधण्याचे काम समाजातील मोठे बकरे करताना दिसत आहेत परंतु ही दुर्दैवी बाब आहे हा समाज स्वच्छ आणि प्रामाणिक काम करणाऱ्या युवकांच्या पाठीशी राहत नाही राहिला नाही त्यामुळे समाजाची वातहात होताना दिसत आहे त्यामुळे समाजातील सुशिक्षित युवकांनी आपल्या हक्काच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणासाठी संघर्ष करणे काळाची गरज आहे आगामी निवडणुका सामोरे बघता काहीतरी हातामध्ये धनगर समाजाच्या पुढील ही आशा समाजातील चळवळीतील युवक करून पाहत आहेत परंतु समाजातील काही लोकांनी लोकांच्या दावणीला बांधण्याचे काम समाज केलेलं आहे परंतु आता समाजातील युवकांनी शांत न राहता तात्काळ राज्य सरकारने धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी चालू अधिवेशनामध्ये या समाजाला न्याय मिळावा अशी भावना देखील शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे.

...तर याचे परिणाम सरकारला निवडणूक दाखवा

काही दिवसांवर विधानसभेच्या निवडणुका येऊन ठेपलेल्या आहेत परंतु धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न सरकार जोपर्यंत सोडवत नाही तोपर्यंत समाजाने यांना मताची भीक देऊ नये अन्यथा आपल्याला पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर माफ करणार नाही कारण प्रमाणिकपणे या समाजाला घटनेमध्ये आरक्षण दिलेला आहे आणि त्याची अंमलबजावणी होत नसेल आणि युवकांना स्वतःचे जीव द्यावे लागत असतील तर हे दुर्दैव आहे समाजातील धनदांडग्यांनी स्वतःची झोळी भरण्यासाठी समाजाचा वापर करू नये असे देखील वाकसे यांनी म्हटले आहे

जिल्ह्यात १७ जुलै रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

बीड । प्रतिनिधी

मराठा , ओबीसी, धनगर व इत्तर समाजाचे विविध उपोषणे, आंदोलने, सभा सुरु असून विधीमंडळ अधिवेशन तसेच जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मिरवणुका, मोर्चे,निदर्शने, आंदोलने, धरणे रस्ता रोको या सारखे अंदोलने सुरु असून किरकोळ कारणाकवरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ३.७. २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १७ जुलै २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

अत्यावश्यक दुरुस्ती तात्काळ करून द्या -डॉ.शंकर धपाटे

सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या सूचना

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयातील वर्ग तीन कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची आज दुपारी अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे यांनी अचानक येऊन पाहणी केली. त्यावेळी सर्व समस्या जाणून घेत अत्यावश्यक ज्या गोष्टी आहेत त्या तात्काळ दुरुस्त करून देण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरवस्थेबाबत सातत्याने ओरड होत आहे. ती दुरुस्त करून देण्यात यावी या मागणीसाठी नुकतेच डीवाय एफआय व कर्मचाऱ्यांच्या वतीने आंदोलनही करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आज अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी स्वारातीमधील वर्ग तीन कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची आज दुपारी येऊन अचानक पाणी केली. त्यावेळी त्यांनी चालू असलेल्या कामाचाही आढावा घेतला. कर्मचाऱ्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागतात व ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्या तात्काळ करून देण्याची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंतांना सूचना केली. त्यामध्ये ड्रेनेज दुरुस्ती, खिडक्या,दरवाजे यांच्यासह जी तात्काळ आवश्यकता आहे ती प्राधान्याने करा. कर्मचाऱ्यांची अडचण लक्षात घेऊन लवकरात लवकर करून द्या. त्याचबरोबर आज तागायत जी कामे झाली आहे त्याची माहिती सादर करा असेही तोंडी आदेश बांधकाम विभागाला देण्यात आले. त्यावेळी त्यांच्यासोबत डॉ.राकेश जाधव,डॉ. नितीन चाटे, डॉ. कचरे,डॉ. वेदपाठक, संबंधित विभागाचे लिपिक सुनील जोगदंड,अंकुश गित्ते,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता गुडवाले,माचवे, नंदु मोरे डीवायएफआयचे तालुका अध्यक्ष देविदास जाधव पत्रकार संतोष केंद्रे,परमेश्वर शेळवणे, सह कर्मचारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून इतर योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला वगळणार

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या आर्थिक बजेटमध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ची घोषणा करण्यात आली. यात शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या १५०० पेक्षा आर्थिक योजनेचा लाभ घेतलेल्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, असे म्हटले आहे.परिणामी निराधार योजनेतील महिलाही या योजनेला आता मुकणार आहेत. संजय गांधी योजना, इंदिरा गांधी योजना व श्रावण बाळ योजनेअंतर्गत या निराधार महिलांचा समावेश असतो.

राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केल्यानंतर त्यात आता सुधारणा करण्यात आली आहे. योजनेची घोषणा झाल्यानंतर जिल्ह्यातील महिलावर्ग मोठ्या प्रमाणात या योजनेचा लाभ घेण्यासाठी सेतू केंद्रात गर्दी करीत आहेत. राज्य शासनाने उत्पन्नाची अट शिथिल केल्यानंतर बुधवारी सेतू केंद्रात हवी तेवढी गर्दी दिसून आली नाही. मात्र, निराधार योजनेतील लाभार्थ्यांना वगळणार असल्याची चर्चा येथे ऐकावयास मिळाली. हजारो महिला विविध निराधार योजनेचा लाभ घेत आहेत. राज्य शासनाच्या धोरणानुसार या योजनेतून निराधार महिला लाभार्थीही पात्र ठरणार नाहीत.

सरासरी १५ टक्के महिला या वयाची पासष्टी (६५) पार केलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचाही येथे समावेश राहणार नाही. मात्र, २१ ते ६५ वयोगटांतर्गत हजारो निराधार महिला मुख्यमंत्री माझी लाडकी

बहीण योजनेला मुकणार आहेत. यामध्ये सर्वसाधारण लाभार्थ्यांसह अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीतील महिला निराधार लाभार्थ्यांचा समावेश राहणार आहे.

यावरही निर्णय घ्यावा

मंगळवारी लाडकी बहीण योजनेच्या काही अटी राज्य सरकारने शिथिल केल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या संबंधीची घोषणा केली.

योजनेच्या पात्रतेमध्ये अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सूट, आदींबाबत घोषणा करण्यात आली. मात्र, निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांबाबत कुठलीही घोषणा करण्यात आली नाही. तसेच राज्यातही मोठ्या प्रमाणात विविध निराधार योजनेचे लाभ घेणाऱ्या लाखो महिला आहेत. किंबहुना निराधार योजनेच्या लाभात राज्य शासनाने वाढीची घोषणा करायला हवी होती किंवा योजनेत समावून घ्यायला हवे, असे या निराधार महिलांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचा मावेजा एक वर्षाच्या आत देण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सोनेगाव येथील शेतकरी हनुमान चौरे व इतर जवळजवळ १२ शेतकऱ्यांची जमीन १५ जून २०१० साली सोनेगाव गाव तलावात संपादित झाली होती . परंतू संपादित क्षेत्राचा निवाडा झाला नाही व शेतकऱ्यांना मावेजा देखील देण्यात आला नाही . उपजिल्हा अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी लघुपाटबंधारे विभाग बीड यांना अनेकवेळा लेखी व तोंडी विनंती करून देखील शेतकऱ्यांना मावेजा मिळत नव्हता तेव्हा सखाराम आप्पासाहेब चौरे , हनुमंत चौरे व इतर शेतकरऱ्यांनी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये ॲड . नरसिंह एल . जाधव यांच्या मार्फत याचिका क्र . १४०५५/२०२१ दाखल केली होती . सदरील याचीकेमध्ये सचिव पाटबंधारे विभाग मुबंई , उपजिल्हाअधिकारी तथा विशेष भूसंपादन

अधिकारी लघुपाटबंधारे विभाग बीड , कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड , यांना प्रतिवादी करण्यात आले होते . वरील याचीकेची सुनावणी दि . २५ जून २०२४ रोजी मा . उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये न्यायमूर्ती रविंद्र व्ही घुगे व वाय.जी. खोबरागडे यांच्यापुढे झाली असता सदरील प्रकरणामध्ये कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड यांनी वरील शेतकऱ्यांच्या जमीनी , जमीन अधिकरण कायदा २०१३ प्रमाणे , जमीन अधिकृत करण्याचा प्रस्ताव तयार करुन जिल्हाअधिकारी बीड यांना ९ ० दिवसाच्या आत पाठवायचे आदेश दिले व त्यानंतर सबंधित अधिकाऱ्याने जमीन अधिकरण कायदा २०१३ च्या तरतुदीचे पालन करुन जमिन अधिकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी व एक वर्षाच्या आत निवाडा जाहीर करावा असे जाहिर केले तसेच या प्रकरणात कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड यांच्यावर ५००० रू . दंड लावून सदरील दंड ३० दिवसाच्या आत उच्च न्यायालय वकील संघ औरंगाबाद यांच्याकडे जमा करण्याचे आदेश दिले . याचीका कर्त्याच्या वतीने ॲड . नरसिंह एल . जाधव यांनी काम पाहिले त्यांना ॲड . गौरव खांडे यांनी सहकार्य केले तसेच शासनाच्या वतिने एस . के . तांबे यांनी काम पाहिले

पिंपळवंडी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील स्वराज्यझेप प्रतिष्ठान यांच्या वतीने शुक्रवार दि.५ जुलै २०२४ रोजी सकाळी १० वाजता गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन केले असून या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती तसेच प्रमुख उपस्थिती परमेश्वर सातपुते शिवसेना जिल्हाप्रमुख बीड,प्रमुख मार्गदर्शक प्रमोद कुदळे उपविभाग अधिकारी पाटोदा,संदीप पवार सर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक,भार्गव सपकाळ स.पोलीस निरीक्षक अंमळनेर पोलीस ठाणे हे राहणार आहेत.

माजलगाव:- लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसंपर्क कार्यालय वरळी,मुंबई येथे दि ०३ जुलै बुधवार रोजी भाजपा राष्ट्रीय सचिव,लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन,त्यांची विधानपरिषदेवर उमेदवारी निश्चित झाल्याबद्दल शुभेच्छा देताना माजलगाव विधान सभा मतदार संघाचे भाजपा नेते रमेशराव आडसकर,यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत,दिपक मुंडे यांची उपस्थित होती.

उच्च शिक्षणासाठी गरजू विद्यार्थ्यांना देणार बिनव्याजी शैक्षणिक कर्ज

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील कै.गजानन डुबे सामाजिक प्रतिष्ठाण यांच्या वतीने दुसऱ्या वर्षी उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या गरजुवंत विद्यार्थ्यांना बिनव्याजी शैक्षणिक कर्ज योजना साठी १३ जुलै पुर्वी आर्ज विद्यार्थ्यांनी करावेत असे अवाहन कै.गजानन डुबे सामाजीक प्रतिष्ठाणचे वतीने करण्यात आले आहे.

किल्ले धारुर शहरातील व तालुक्यातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरु व गरजुवंत विद्यार्थ्यांना कै.गजानन डुबे यांच्या स्मरणार्थ शैक्षणिक बिनव्याजी कर्ज योजना चालू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुण, आर्थिक परिस्थिती याचा विचार करुन बिनव्याजी कर्ज देण्याचा संकल्प केला आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांनी या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा. दिनांक ४ जुलै २०२४ पासुन दिनांक १३ जुलै २०२४ या तारखेपर्यंत अर्ज किंवा गरजूवंतानी संपर्क साधावा. तरी शहरातील व तालुक्यातील बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी कै.गजानन डुबे सामाजिक प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क :- १) आनंद रामचंद्र डुबे - ९८९०२०३२३२. २) निलेश जयप्रकाश डुबे - ९४२३१७१७४८. ३) धिरज धर्मपाल भावठाणकर - ७३८५४३५०६६. ४) सतिष नंदकुमार पिलाजी - ९४२३७०००५०. ५) सचिन सुधाकर गुंडेवार - ९२७३१४५१४५. ६) निमेश जिवनराव चिद्रवार - ९९६०९७७२४७. यांचे कडे संपर्क करावा असे अवाहण करण्यात आले आहे.

श्री क्षेत्र अश्वत्थलिंग ते पंढरपूर पायी दिंडीचे उद्या होणार प्रस्थान -महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर संस्थांनची पिंपळवंडी ते पंढरपूर आषाढी वारी निमित्त पायी दिंडी सोहळ्याचे उद्या शनिवार दि.६ जुलै २०२४ रोजी सकाळी ९:३० वाजता प्रस्थान होणार असून या पायी दिंडी सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन पंढरीची वारी करावी असे आवाहन श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती श्रीश्री १००८ श्री स्वामी महंत परमपूज्य गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांनी केले आहे.

याविषयी माहिती अशी की,श्री स्वामी महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली याही वर्षी दि.६ ते

१८ जुलै २०२४ दरम्यान पिंपळवंडी ते पंढरपूर दरम्यान पायी दिंडीचे आयोजन केले असून शनिवार दि.६ जुलै २०२४ सकाळी ९:३० वाजता श्री अश्वत्थलिंग महादेव मंदिर व श्री.स्वामी गंगाभारती महाराज मठ येथे पूजा आरती होऊन प्रस्थान होऊन सकाळी ११ वाजता पिंपळवंडी येथे दिंडीचे स्वागत व चहा व नाष्टाचे आयोजन केले असून पायी दिंडी कुळंब-सौताडा-जामखेड,जामखेड तालुक्यातील चुंबळी,पाडळी फाटा, धोंडपारगाव तसेच आळजापुर फाटा, पोथरे,करमाळा,देवळाली,कुंभज फाटा,आदिनाथ सहकारी कारखाना, बिटरगाव,फूटजळगाव,टेंभुर्णी,परीते, करकम मार्गे रविवार दि.१४ जुलै २०२४ रोजी महादेवानंद भारती बाबा मठ शेगाव दुमाला पंढरपूर येथे पोहोचणार असून पायी दिंडीचे मार्गात अनेक ठिकाणी दिंडीतील वारकऱ्यांसाठी चहा, नाश्ता, भोजनाची सोय भाविक अन्नदात्यांनी केलेली असून दिंडी मुक्कामी ठिकाणी नियमित रात्री हरिकिर्तन,हरी जागर होणार आहे.

माजलगाव-तेलगाव रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाच्या मंजुरीचे सर्वसामान्यांना श्रेय -भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव-तेलगाव रस्त्याची दुरावस्था झाल्याने अनेक अपघात झाले. या रस्त्याच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी विविध संघटना व सर्वसामान्यांनी रस्त्यावर येऊन आंदोलन केले आहे. यानंतर माजलगाव-तेलगाव रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामास केंद्र शासनाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. यामुळे या कामाचे श्रेय हे सर्वसामान्यांचे असून कोणीही याचे श्रेय घेऊ नये असे शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी म्हटले आहे.

थावरे म्हणाले की, माजलगाव-तेलगाव हा पालखी मार्ग सिमेंट रस्ता करण्यात आला. मात्र काही महिन्यातच या रस्त्याला मोठ मोठ्या भेगा पडल्या. या भेगांमध्ये दुचाकीचे टायर अडकून अनेक अपघात झाले आहेत. यामुळे अनेकांना जीव तर काहींना हात पाय गमवावे लागले आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शेतकरी संघर्ष समितीसह सर्वसामान्य नागरिकांनी वारंवार आंदोलने केली. यामुळे या मार्गावर काही ठिकाणी रस्ता दुरुस्तीचे कामही करण्यात आले. दरम्यान सर्वसामान्यांनी केलेल्या आंदोलनामुळेच आज माजलगाव-तेलगाव रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामास केंद्र शासनाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. मात्र काही स्थानिक नेते याचे श्रेय घेऊ पहात आहे. खरे तर या यशाचे श्रेय हे सर्वसामान्य जनतेला असून कोणीही याचे श्रेय घेऊ नये असे आवाहन भाई गंगाभिषण थावरे यांनी केले आहे.

सोयाबीनवरील क्लोरोसिस विकृतीचे करा एकात्मिक व्यवस्थापन : शिवप्रसाद येळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जून महिन्यामध्ये वेळेत पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केली आहे मात्र काही ठिकाणी पावसाची उघडीप होऊन ढगाळ वातावरणामुळे जमिनीमधून अन्नद्रव्य घेण्यास अडथळा आल्यामुळे सोयाबीनची नवीन येणारी पाने पिवळसर दिसत आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणी झाल्यानंतर उगवण पूर्व तणनाशक फवारणी केल्यामुळे हलक्या जमिनीवर सोयाबीन पिवळे

पडल्याचे निदर्शनास येत आहे. काही ठिकाणी चुनखडी युक्त पांढऱ्या जमिनीवर सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे सोयाबीन, उडीद, ऊस पिकाची पाने पिवळी पडत असल्याचे निदर्शनास येत आहे ही सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता म्हणजेच क्लोरोसिस (हरितरोग) ही विकृती असून याच्या व्यवस्थापनासाठी १९:१९:१९ हे फॉलियर ग्रेड विद्राव्य खत ५ ग्रॅम अधिक महाराष्ट्र ग्रेड दोन द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्याची २ मिली प्रति १ लिटर पाणी किंवा पावडर स्वरूपातील महाराष्ट्र ग्रेड दोन सूक्ष्म अन्नद्रव्याची २ ग्रॅम याप्रमाणे फवारणी करावी. सोयाबीमधील तणांच्या व्यवस्थापनासाठी जमिन वापस्यावर येताच आंतरमशागतीद्वारे हात कोळपे किंवा बैलचलीत कोळप्याच्या सहाय्याने ◀◀ पान ३ वर

आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे-शिरसाठ यांचा सेवापुर्ती कार्यक्रम संपन्न

मानूर । प्रतिनिधी

आरोग्य विभाग बीड अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात दि. २६ फेब्रुवारी १९८६ ते ३० जून २०२४ या कालावधीत आपली सेवा लोणी, मानूर ,शिरूर कासार येथे ३८ वर्षे ४ महिने ४ दिवस पूर्ण करत बिजूताई जगन्नाथ ढाकणे या सेवानिवृत्त झाल्या. आपल्या संपूर्ण सेवेत त्यांनी सामान्य माणसाच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत खूप प्रामाणिक व जबाबदारीने सेवाकार्य पार पाडले आहे. बीजुताई ढाकणे यांनी संपूर्ण सेवेत कामाला प्रथम प्राधान्य

दिले.कार्य हेच ध्येय मानून काम केले त्यामुळे त्यांना अधिकच्या दोन वेतनवाढ मिळाल्या.चांगल्या कामाचे फळ म्हणून त्यांना मुंबई येथे २००४ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट आरोग्य सेविका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. यावेळी आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे बोलताना म्हटल्या की माझी सेवा यशस्वी होताना अनेकांचे सहकार्य मिळाले. माझे पती लिंबाजी शिरसाट व परिवारातील सर्व सदस्यांची खूप खूप साथ मिळाली.मला कोणतेही वाहन चालवता येत नाही पण कधीही माझे काम थांबले नाही.जेंव्हा ज्यांना जी गरज आहे त्यांना ती मदत करण्याचा प्रयत्न केला.माझ्या संपूर्ण सेवेत एकही शासकीय तक्रार नाही.शासकीय अधिकारी,सहकारी व लोक यांच्याशी स्नेहाचे नाते जोडत मी माझे कार्य पूर्ण करत राहिले व यामध्ये मला सर्वांचे सहकार्य मिळाले. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पालखीचा नगारा अडवणे गावकऱ्यांच्या आले अंगलट

संरपंचासह २० पदाधिकारी व ग्रामस्थांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील नगारा अडवणे उरुळी कांचन गावकऱ्यांच्या चांगलेच अंगलट आले आहे. नगारा अडवून पालखी सोहळ्यात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी संरपंचासह १५ ते २० पदाधिकारी व ग्रामस्थांवर गुन्हा दाखल केला आहे. अमित कांचन (सरपंच), भाउसाहेब कांचन (माजी सरपंच), अलंकार कांचन, संतोष उर्फ पप्पू कांचन, प्रताप कांचन, राजेंद्र कांचन व इतर १५ ते २० पदाधिकारी व ग्रामस्थ, (सर्व राहणार उरूळी कांचन ता. हवेली जि. पुणे) अशी पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल राजकुमार भिसे यांनी फिर्याद दिली आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सासवड जेजुरी मार्गे पंढरपूरकडे मार्गस्थ झाला असून संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सोलापूर रस्त्यावरून बारामती मार्गे पंढरपूरकडे जात आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने बुधवारी उरुळी कांचन गावात प्रवेश केला. वर्षानुवर्षं चालू असणाऱ्या परंपरेप्रमाणे पालखी सोहळा आश्रम रोड मार्गे तळवाडी चौकातून गावाला प्रदक्षिणा घालून पुढे यवत ला मार्गस्थ होतो. तसेच उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालयातील प्रागंणात दोन तासाच्या विसाव्यासाठी थांबतो.

पालखी सोहळा उरुळी कांचन येथे दोन तासाच्या विसाव्यासाठी येणार असल्याने महात्मा गांधी विद्यालयातील प्रागंणात वारकऱ्यांसाठी मंडप उभारण्यात आला होता. ग्रामपंचायत प्रशासनाच्या माध्यमातून विद्यालयाच्या प्रागंणात हिरकणी कक्ष, महाप्रसाद, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधान गृह आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या होत्या. मात्र, यावर्षी संत तुकाराम महाराज सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सोहळ्याचा मार्ग बदलला. सोहळ्याच्या प्रवासाचा तपशील पूर्वीच जाहीर केला होता. त्यामध्ये उरुळी कांचन गावातील विसावा रद्द करून, तो उरुळी कांचन फाट्यावर होईल असा उल्लेख केला होता. मात्र, सोहळा प्रमुख व विश्वस्तांच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त करत गावातील नेते मंडळी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी येथील एलाईट चौकात पालखी सोहळ्याचा नगारा आडवत घोषणा बाजी केली. दरम्यान, या प्रकारानंतर पोलिसांनी सरपंचासह वीस ते पंचवीस पदाधिकारी व ग्रामस्थांवर गुन्हा दाखल केला आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने 'अपघातमुक्त वारी' अभियानाचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी भाविकांत रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती व्हावी यादृष्टीने 'अपघातमुक्त वारी' अभियानाचे आयोजन करण्यात आले.

या अभियानात पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत आळंदी रोड, दिवे कार्यालय येथे शुभ्र वस्त्रात टाळ मृदुंगाच्या साथीने वारकऱ्यांमध्ये रस्ता सुरक्षा, वाहतूक नियम, लेन शिस्त, उजवीकडून चाला, वेग नियंत्रण आदीबाबत जागर करण्यात आला. 'डावी बाजू गाडीची उजवी बाजू पायांची' असा संदेश देणारी दोन वारी कालावधीची दिनदर्शिका तसेच 'पाळावा नियम, बाळगावा संयम', 'सुरक्षित अंतर, सुरक्षित प्रवास' असा संदेश असणाऱ्या एक प्रत्येकी हजार कापडी शबनम पिशव्या, रेनकोट व दोन हजार रस्ता सुरक्षेबाबत पत्रकांचे वारकऱ्यांना वाटप करण्यात आले. रस्ता सुरक्षा परावर्तित फलक (रिफ्लेक्टर्स) सुयोग्य ठिकाणी लावून रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विश्रांतवाडी चोक, आळंदी रोड, बंडगार्डन, कोरेगाव पार्क, दिवे घाट (सासवड रोड) व ऊरुळी कांचन येथे वारकऱ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सर्व मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटर वाहन निरीक्षक व वाहनचालकांनी पालखीत उस्फूर्त सहभाग घेतला, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिली.

वसंत मोरेंच्या हाती ठाकरेंचे शिवबंधन मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची घेतली भेट

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी मातोश्रीवर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज भेट घेतली आहे. ९ जुलै रोजी ते हाती शिवबंधन बांधणार आहेत. मनसेच्या स्थापनेपासून कार्यरत असणारे आणि राज ठाकरे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेले वसंत मोरे यांनी मनसेचा राजीनामा देऊन वंचित आघाडीतून लोकसभा निवडणूक लढविली होती.

वसंत मोरे पुणे महापालिकेत तीनवेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी मनसेचा राजीनामा दिला होता. त्यांना वंचित बहुजन आघाडीने पुण्यातून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात

उतरविले होते. मात्र त्यांचा पराभव झाला. आज त्यांनी उद्धव ठाकरेंची मातोश्रीवर जाऊन भेट घेतली. ९ जुलैला ते ठाकरे गटात कार्यकर्त्यांसह प्रवेश करणार आहेत. त्यांना अगामी विधानसभा निवडणुकीत हडपसर किंवा खडकवासला या मतदारसंघातून आमदारकीचं तिकीट मिळण्याची शक्यता आहे. ९ तारखेला मातोश्रीवर समर्थकांसह प्रवेश करणार आहे. आज उद्धव ठाकरे यांची भेट घेतली असून त्यांच्यासोबत प्राथमिक चर्चा झाली. लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडीमध्ये गेलो होतो. पण मतदारांनी स्विकारलं नाही. त्यामुळे शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे वसंत मोरे यांनी ठाकरे यांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. मनसेच्या स्थापनेपासून वसंत मोरे राज ठाकरे यांच्यासोबत होते. मनसेतून लोकसभा निवडणूक लढविण्याची जाहीर इच्छा त्यांनी बोलून दाखविली होती. त्यासंदर्भात त्यांनी महाविकास आघाडीतील शरद पवार, संजय राऊत यांच्या भेटी घेतल्या होत्या. महाविकास आघाडीत पुणे लोकसभेची जागा काँग्रेसकडे होती. महाविकास आघाडीची उमेदवारी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मोरे यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. नंतर वंचित बहुजन आघाडीतून त्यांनी पुणे लोकसभा लढविली, मात्र त्यांचा पराभव झाला. त्यांना ३२०१२ मते मिळाली होती.

शहरातील १२ गर्भवतींचे नमुने एनआयव्हीकडे

पुणे । प्रतिनिधी

शहरात आतापर्यंत दोन गर्भवतींना झिकाची लागण झाल्याचे निदर्शनास आले आहे. इतर रुग्णांमध्ये झिकाचा प्रादुर्भाव डेंग्यूप्रमाणे सामान्य असला, तरी गर्भवतींपासून बाळालाही धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून झिका रुग्णांच्या परिसरातील गर्भवतींच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे (एनआयव्ही) पाठविण्यात आले आहेत. यामध्ये मुंढवा आणि डहाणूकर कॉलनी येथील पाच आणि एरंडवणे येथील दोन गर्भवतींचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार एनआयव्हीमध्ये होणारी तपासणीच ग्राह्य धरली जाणार आहे. त्यामुळे खासगी प्रयोगशाळेत तपासणी झाली असल्यास रुग्णाला संशयित गृहीत धरून त्यांच्या रक्ताचे नमुने एनआयव्हीकडे पाठविले जात आहेत. याबाबत खासगी रुग्णालये आणि खासगी प्रयोगशाळांना वारंवार आवाहन करण्यात येत आहे. मंगळवारी प्रभात रस्त्यावरील एका रुग्णाचा झिकाचा अहवाल खासगी प्रयोगशाळेमध्ये पॉझिटिव्ह आला होता. त्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी एनआयव्हीकडे रक्तनमुना पाठविण्याची विनंती केली. मात्र, संशयित रुग्णाने कर्मचाऱ्यांना सहकार्य न करता परत पाठविले. नागरिकांनी सहकार्य न केल्यास झिकाचा प्रादुर्भाव रोखणार कसा? असा प्रश्न महापालिकेकडून उपस्थित करण्यात आला आहे.

शहरातील सर्व डासोत्पत्ती स्थाने नष्ट करावीत, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात येत आहे. अन्यथा दंड आकारण्यात येणार आहे. एरंडवणेतील ४४ घरमालकांना नोटीस देण्यात आली असून, ८३०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

मुंढव्यात ९ घरमालकांना नोटीस देऊन ५ हजारांचा दंड केला आहे. डहाणूकर कॉलनी येथील ४ घरमालकांना नोटीस देऊन ३ हजारांचा दंड करण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

नागरिकांनी ताप आल्यास त्वरित सरकारी दवाखान्यांमध्ये डॉक्टरांची भेट घ्यावी. घरातील, गावातील सर्व पाणीसाठे वाहते करावेत, पाण्याची भांडी कापडाने झाकून घ्यावीत, जे सिमेंटचे कंटेनर रिकामे करता येत नाहीत अशांमध्ये गप्पी मासे किंवा टेमिफॉस या अळीनाशकांचा वापर करावा, रात्री-दुपारी झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, दिवसा पूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

समस्याग्रस्त ज्येष्ठ नागरिकाची समाज कल्याण विभागाकडून सुटका

पुणे । प्रतिनिधी

तळेगाव दाभाडे येथील राव कॉलनीत राहणाऱ्या समस्याग्रस्त ८० वर्षीच ज्येष्ठ नागरिकाची समाज कल्याण विभागाच्या पथकाने त्यांच्या निवासस्थानी भेट देवून सुटका केली. सुटका केल्यानंतर त्यांना वृद्धाश्रमात पाठविण्यात येणार आहे.

सांची इंटिग्रेशन असोसिएशन पुणे या संस्थेने तळेगाव दाभाडे येथे राहणाऱ्या गंगाधर कडाळी यांना नातेवाईकांडून वाईट वागणूक दिली जात असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाला दिली. माहिती मिळाल्यावर सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी एन.एस. मकवाना आणि सीमा पांचाळ यांना माहिती घेण्यासाठी कडाळी यांच्याकडे पाठविले. ज्येष्ठ नागरिक श्री.कडाळी हे त्यांच्या मुलीच्या घरी रहात होते. समाज कल्याण विभागाच्या पथकाने घरी भेट दिली असता टेरेसवर अनारोग्यदायी वातारणात पलंगावर ते बसलेले आढळले. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झालेली होती. पथकाने त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी होणारा त्रास सांगतांना वृद्धाश्रमात येण्याची इच्छा व्यक्त केली.

सांची इंटिग्रेशन असोसिशनचे डी.आर.परिहार, श्री.मकवाना आणि श्रीमती पांचाळ यांनी श्री.कडाळी यांना पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचारासाठी नेले. त्यांची प्रकृती बरी झाल्यानंतर त्यांना वृद्धाश्रमात पाठविण्याची व्यवस्था समाज कल्याण कार्यालयामार्फत करण्यात येणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड शासकीय वसतीगृहाच्या अधीक्षकांनी दिली आहे.

नागरिकांनी वृद्ध व्यक्तींची योग्यप्रकारे काळती घ्यावी. योग्यप्रकारे काळजी न घेतल्यास ज्येष्ठ नागरिक व आईवडील यांचे चरितार्थ अधिनियम २००७ नियम २०१० नुसार संबंधित नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्यात येईल आणि समाज कल्याण विभागातर्फे निर्वाह भत्ता वसूल करण्यात येईल असेही कळविण्यात आले आहे.

जिल्ह्यातील पर्यटनस्थळ परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मावळ, मुळशी, हवेली, आंबेगाव, खेड, जुन्नर, भोर, वेल्हा तालुक्यातील ऐतिहासिक वास्तू, गड, किल्ले व स्मारके, पर्यटनस्थळे, धरणे आदी ठिकाणी वर्षाविहार, पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे प्राधिकरण अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी पर्यटनस्थळ परिसरात ३१ जुलै २०२४ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

जिल्ह्यातील घाट परिसरात पावसाळा सुरू असल्याने बऱ्याच ठिकाणी धबधबे तयार झालेले आहेत. तसेच भुशी, मुळशी, भाटघर, खडकवासला धरण परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक वर्षाविहार पर्यटनासाठी येत असतात. सुट्टीच्या दिवशी राज्याच्या विविध भागातून तसेच मुंबई शहर व पुणे शहरातून पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. अशावेळी वाहतूक कोंडी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सदर आदेश देण्यात आले आहेत. मावळ तालुक्यातील भुशी डॅम, धरणे व गड किल्ले परिसर, वडगाव मावळ येथील बेंदेवाडी, डाहुली' (आंदर मावळ) पाण्याचे धबधबे व लोणावळा शहर आणि ग्रामीण हद्दीतील धरण व गडकिल्ले परिसर टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट, राजमाची पॉईंट, खंडाळा, सहारा ब्रीज, पवना धरण, टाटा धरण, घुबड तलाव परिसर, मुळशी तालुक्यातील मुळशी धरण व ताम्हीणी घाट जंगल परिसर व मिल्कीबार धबधबा, हवेली तालुक्यातील खडकवासला धरण, वरसगाव धरण व सिंहगड, गडकिल्ले परिसर, आंबेगाव तालुक्यातील भिमाशंकर, डिंभे धरण परिसर, कोंडवळ धबधबा, जुन्नर तालुक्यातील माळशेज घाट तसेच धरणे व गडकिल्ले परिसर, शिवनेरी व माणिक डोह, भोर तालुक्यातील भाटघर धरण व गडकिल्ले परिसर, पाण्याचे धबधबे, वेल्हा तालुक्यातील धरण व गडकिल्ले परिसर, कातळधरा धबधबा, खेड तालुक्यातील चासकमान धरण व भोरगिरी घाट, पाण्याचे धबधबे व जंगल परिसर आणि इंदापूर तालुक्यातील कुंभारगाव बोटींग क्षेत्रात हे आदेश लागू असतील. या आदेशानुसार पाच किंवा पाच पेक्षा जास्त व्यक्तींना वरील नमूद ठिकाणी एकत्र येण्यावर प्रतिबंध राहील, पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे, धबधब्यावर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे, पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, थोकादायक वळणे आदी ठिकाणी सेल्फी काढण्यास प्रतिबंध राहील. पावसामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक धबधब्याच्या परिसरामध्ये मद्यपान करणे, मद्यधुंद अवस्थेत प्रवेश, कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे, वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे, वाहनांची ने-आण करताना बेदरकारपणे वाहन चालवणे, धोकादायक स्थितीत वाहन ओव्हरटेक करणे, सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टिकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टिकचे साहित्य उघड्यावर व इतरत्र फेकण्यासही प्रतिबंध राहील.

सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगल टवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डिजे यंत्रणा वाजविणे, त्यामुळे ध्वनीप्रदूषण करणे, ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करणे, धबधब्याच्या १ किलोमीटर परिसरात सर्व दुचाकी, तीनचाकी, चारचाकी व सहा चाकी वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. केवळ आपत्ती व्यवस्थापनाच्या वाहनांना अनुमती असेल.या आदेशाचे कोणतीही व्यक्ती, संस्था, संघटना यांनी उल्लघंन केल्यास ते आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ नुसार दंडनिय अथवा कायदेशीर कारवाईस पात्र राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

ललित पाटील पळून गेल्याची माहिती ३ तास उशिराने दिली, पुणे पोलीस दलातून २ कर्मचाऱ्यांची हकालपट्टी

पुणे । प्रतिनिधी

ललित पाटील ससून रुग्णालयातून पलायन प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. पुणे पोलीस मुख्यालयातील दोन कर्मचारी बडतर्फ करण्यात आले आहे. ललित पाटील पळून गेल्याची माहिती नियंत्रण कक्षास तीन तास उशीरा देणाऱ्या दोन पोलीसांना शासकीय सेवेतून काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले आहे. हे दोघे ललित सोबत एक्सरेसाठी गेलेच नसल्याचे चौकशीत समोर आले आहे.

पुण्यातील ससून रुग्णालयात आजारपणाचं कारण देत ड्रग्स रॅकेट चालवत होता. त्यावेळी ससून रुग्णालयातील गेटवर २ कोटी १४ लाखांचं ड्रग्स सापडलं होतं. त्यानंतर हे सगळं मोठं ड्रग्स रॅकेट पुढे आलं. या रॅकेटचा तपास करताना बड्या लोकांचा हात असल्याचं समोर आलं. त्यानंतर सगळ्यांची कसून चौकशी सुरु झाली. ससून रुग्णालयातील कर्मचारी, पोलीस, कारागृह पोलीस, कारागृहातील डॉक्टरांसह ससून रुग्णालयातील डॉक्टरांचा संबंध असल्याचं समोर आलं होतं. या प्रकरणी पोलीस कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आलं होतं आणि सहा जणांना निलंबित करण्यात आलं होतं. ड्रग्ज माफिया ललित पाटील याला ससून रुग्णालयात एक्स रे साठी दोन कर्मचारी घेऊन जाणार होते.मात्र हे दोघे ललित पाटील सोबत एक्सरेसाठी गेलेच नसल्याचे चौकशीत समोर आले आहे. एवढच नाही तर नियंत्रण कक्षास ही माहिती तब्बल तीन तास उशीरा देण्यात आली.

पोलीस हवालदार आदेश शिवणकर आणि पिराप्पा बनसोडे अशी या दोन पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पुणे पोलीस मुख्यालयातील या दोन्ही कर्मचाऱ्यांना आता सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. नियंत्रण कक्षास माहिती दिली असती तर पळून गेलेल्या ललीत पाटीलला पकडता आले असते. परंतु या दोघांनी वरीष्ठ अधिकारी तसेच नियंत्रण कळवले नाही, चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे.

शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत सहभागी व्हावे

पुणे । प्रतिनिधी

''राज्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव करण्यासाठी राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा,'' असे आवाहन कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगामामध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, सूर्यफूल या ११ पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख मूग व उडीद पिकासाठी ३१ जुलै, तर भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी अंतिम तारीख ३१ ऑगस्ट आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र राहील. शुल्क सर्वसाधारण गटासाठी ३०० रुपये व आदिवासी गटासाठी १५० रुपये राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः: कसत असणे, आवश्यक आहे. शेतकऱ्याला एकाचवेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड केलेली असणे आवश्यक आहे.

राज्यस्तरिय रोईंग स्पर्धा: एमआयटी एडीटी विद्यापीठाची बाजी

पुणे । प्रतिनिधी

येथील मिलिटरी इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या आर्मी रोईंग नोडवर नुकत्याच पार पडलेल्या ४९व्या महाराष्ट्र राज्य आऊटडोअर रोईंग अजिंक्यपद स्पर्धेत येथील एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या डॉ.विश्वनाथ कराड क्रीडा अकादमीने तीन सुवर्ण, एक रौप्य व एका कांस्य पदकासह बाजी मारली आहे.वरिष्ठ डब्ल्यू-२ गटात स्नेहा सोळंकी, भाग्यश्री घुले या जोडीने तरसब-ज्युनियर (१५ वर्षांखालील) गटात प्रतीक पवार व सांघीक एसजेबी-४ गटात वैभव लाड, श्रेयस गर्जे, प्रथमेश कांदे, कार्तिक कांबळे यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली. तरज्युनियर(१८ वर्षांखालील) गटात ओम लाड व शुभंकर फड या जोडीला सुवर्णपदक अगदी थोड्या फरकाने हुकल्याने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तर एसजेबी-२ गटात वैभव लाड व कार्तिक कांबळे यांनी कांस्य पदक कमावले.या कामगिरीनंतर विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ.सुनीता कराड, प्र.कुलगुरू डॉ.अनंत चक्रदेव, डॉ.मोहित दुबे, डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभाग संचालक प्रा.पद्माकर फड यांनीखेळाडूंचेअभिनंदन केले आहे.

'इनडोअर'मध्ये एकतर्फी वर्चस्व

इनडोअर रोईंगमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावताना एकूण सहा सुवर्णपदकांसह या प्रकारात आपले वर्चस्व गाजवले. विद्यापीठाने वरिष्ठ गटात एम१ई, एलडब्ल्यू१इ, मिश्र४ई, एलमिश्र४ई आणि सब-ज्युनिअर(१५ वर्षांखालील)बी१ई व बी२ई गटात सुवर्ण कामगिरी केली. यामध्ये आदित्य केदारी, भाग्यश्री घुले, स्नेहा सोळंखी, योगेश बोरोले, प्रतीक पवार, प्रथमेश कांदे, श्रेयश गर्जे या खेळाडूंचा समावेश होता.